# श्रीगुरुचरित्र पद्यामृत

[ ...त्राचें संपूर्ण पद्यमय रूपांतर ]
...माहितीहि आहे. अनुक्रमणिका पहा.

म. ग्रं. सं. ठाणें
...य काव्य
...क्र. १६४७८



## – श्रीगुरुचे भक्तांस आश्वासन –

ग्रंथाचे आदरे करुनी पूजन ॥
जो गायनी करील माझे स्मरण ॥
तयाचे घरी मी नित्य राहीन ॥
ही भाक माझी सत्य जाण ॥१॥

(श्रीगुरुचरित्र अ. ५२ वा.)

लेखक :
...ास्त्री कान्हे, उमरावतीकर
...ु. डोंबिवली, जि. ठाणें

REFBK-0014083

तृतीयावृत्ति ] १९६४ [ किं. रु. १-५०

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

# आमची वैशिष्ट्यें

१) ज्योतिषशास्त्रासंबंधीची सर्व कामें आमचेकडे होतात. वर्ष भविष्य, जन्म पत्रिका, संपूर्ण जन्म भविष्य, ग्रहपीडा निवारण, नोकरी, व्यापार, आजार वगैरे संबंधी सर्व कामें काळजीपूर्वक केली जातात. निरनिराळया कार्यसिद्धिसाठीं मंत्रसिद्ध करून दिले जातात. चौकशी करावी.

२) कोणत्याही रोगावर योग्य तपासणी करून प्रकृती कळविल्यास उपचार कळवितो अथवा औषधही देतो. आमचा वैद्यकीय सल्ला आपल्या फायद्याचा ठरेल. परगांवी पोस्टानें औषध पाठवूं. उत्तरासाठीं पोस्टेज पाठवा.

३) नेत्रयोग गुटिका :—ह्याची जाहिरात पुस्तकाच्या मागील बाजूस आहे ती पहावी.

: पत्ता :

**नरहरशास्त्री कान्हे,**

डोंबिवली–मुंबई.

---

प्रकाशक : **नरहरशास्त्री कान्हे उमरावतीकर**, डोंबिवली–मुंबई.

मुद्रक : **स.पां. जोशी**, रामदास मुद्रणालय, शिवाजी पार्क, दादर, मुंबई २८

# श्रीगुरुचरित्र पद्यामृत

श्रीगुरुचरित्राचें संपूर्ण पद्यमय स्वरूप

( श्रीदत्त उपासनेसहित )

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३७०७१५ दि. ०७।०९।
क्रमांक १९८ ... ग्रं. दि. ५।३।६५
१४०८३
REFBK-0014083

: लेखक :

श्रीक्षेत्र गाणगापूर येथील श्रीदत्ताचे सेवेकरी
कीर्तनरत्न नरहरशास्त्री कान्हे, उमरावतीकर
पांडुरंगवाडी, मु. डोंबिवली, जि. ठाणें

तृतीयावृत्ति ]  १९६४  [ किं. रु.१-५०

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

# प्रथमावृत्तीची प्रस्तावना

श्रीगुरुचरित्रासारख्या प्रासादिक ग्रंथाची माहिती नसलेला मनुष्य सुशिक्षित नि महाराष्ट्रीय समाजांत विरळाच. प्रत्यक्ष पारायणें अथवा सप्ताहक्रमानें वाचून अनेकांनीं आपली व्यावहारिक व पारमार्थिक कामें पूर्ण करून घेतल्याचीं कितीतरी उदाहरणें आहेत. तथापि यांतील अ. २६-३६-३७ हे असे आहेत कीं इच्छा असूनही भगिनी व शूद्रबंधूंना हा ग्रंथ वाचतां येईना; ती अडचण यांत दूर केली असून श्रीगुरूंच्या प्रेरणेनें प्रथमपासून अखेरपर्यंत संपूर्ण पद्यमय, सोप्या चालींत, सुबोध शब्दरचनायुक्त, सप्ताह-पद्धती कायम ठेवून हीं पद्यें श्रीगुरूंनीं माझेकडून लिहवून घेतली आहेत. निमित्तमात्र मी. लेखक श्रीगुरुच खरें. आधींच श्रीदत्त महाराज गायनप्रिय. त्यांतहि त्यांची लीला पद्यरूपानें गायिल्यावर दुधांत साखर पडल्याचा आनंद मिळेल. दिवसांनुदिवस येणाऱ्या कटुकालाकडे नजर दिल्यास आज धार्मिक उपासेची राष्ट्राच्या 'अभ्युदयासाठीं किती जरूर आहे, हे सूज्ञास सांगणें नको. एक पद्य अथवा सप्ताह याचें क्रमानें आपल्या घरांत नेहमीं वाचन ठेवल्यास श्रीगुरु कृपामृताचा वर्षाव आपलेवर होईल हा विश्वास ठेवावा. आपण घ्या व आपले मित्रांस कळवा.

आपला,

शके १८७२, श्रीदत्त जयंती

नरहरशास्त्री कान्हे

# द्वितीयावृत्तीची प्रस्तावना

आम्हांला ही गोष्ट नमूद करण्यांत आनंद होतो .कीं प्रथमावृत्ति असल्या कालांतही अल्पावधींत संपून ही दुसरी आवृत्ति काढण्याचा सुयोग आला. यावरून या ग्रंथाविषयीं महाराष्ट्रीय समाजांत किती आदर आहे हे सिद्ध झाले. या आवृत्तींत कांहीं पदें नवीन-जुनीं कायमच आहेत. श्रीदत्त उपासना, श्रीदत्ताचा धांवा, स्तोत्रें, मंत्र, भूपाळी, पाळणा वगैरे व नवीन १० पदें घालून आवृत्ति वाढविली आहे. तरी भाविक बंधू-भगिनीवर्गानें अवश्य आश्रय द्यावा ही विनति.पहिल्याच आवृत्तीचे वेळीं बऱ्याच वर्तमानपत्रांतून या ग्रंथाचें गुणगान येऊन गेलें आहे. कितीतरी भाविक स्त्री-पुरुष घरोघरीं यांतील पदें गाऊन सप्ताह वाचून श्रीगुरुंची सेवा करीत आहेत. कांहीं भक्तांचे हेतु पूर्ण झाल्याची पत्रेंही आमचेकडे आलीं आहेत. आपण घ्या व इतरांना घ्यावयास लावा ही विनंति.

श्रीदत्तदास,

कीर्तनरत्न **नरहरशास्त्री कान्हे**

पांडुरंगवाडी, मु. डोंबिवली, जि. ठाणें

गुरुपौर्णिमा

आषाढ, शके १८७४.

# तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

श्रीगुरुचरित्र पद्यामृताच्या दोन आवृत्त्या संपल्या. पण अजून या पुस्तकांची मागणी कायम आहे. यावरून श्रीदत्तभक्तांना हे पुस्तक अत्यंत आवडले असल्याचे सिद्ध झाले आहे. तिसरी आवृत्ति यापूर्वीच निघायला हवी होती. पण आर्थिक अडचण, कागदाची महर्गता, छपाईच्या किंमती वाढलेल्या अशा स्थितींत छापणें शक्य झाले नाहीं. तरी पण सुजनांच्या मागणीप्रमाणें थोड्या प्रति काढण्याचे ठरविले. पूर्वीच्या दुसऱ्या आवृत्तींत शेवटीं कांहीं श्रीदत्ताची नवीन पदें व देवीची कांहीं पदें-गौळण वगैरे घालून ही तिसरी आवृत्ति वाढविली आहे. महागाईमुळें किंमत जास्त वाढवावी लागली आहे. पण तीही अल्प म्हणजे आठ आणे. १ रु. ऐवजीं १॥ रु. इतकीच. सर्व सद्‌भक्तांनीं पूर्वीच्या दोन्ही आवृत्तींप्रमाणें याही आवृत्तीला उदार आश्रय द्यावा ही विनंति.

श्रीदत्तदास,

कीर्तनरत्न **नरहरशास्त्री कान्हे**

पांडुरंगवाडी, मु. डोंबिवली, जि. ठाणें

वर्षप्रतिपदा

शके १८८६

———

डोंबिवली,
ता. १-५-१९६४.

॥ श्री ॥

# भारताच्या कल्याणासाठीं

सज्जन हो,

श्रीदत्त उपासना ही राष्ट्र कल्याणासाठीं आवश्यक असलेली महत्वाची बाब आहे. पूर्वीं जंघासुर नामक राक्षसाने पृथ्वी पादाक्रांत केली असतां श्री दत्तात्रेयाने दिलेल्या महाशक्तीच्या सामर्थ्याने इंद्रादि सर्व देवांनी समरांगणात लढून त्या दुष्ट दैत्यांचा नाश केला. आजही भारतावर बाहेरून चीन-पाकिस्तान सारख्या देशाकडून भयानक संकट येण्याचा संभव आहे. एकदा येऊन गेले आहेच. अशावेळीं शारिरीक शक्ती तर हवीच. पण मानसिक शक्तीही हवी. आणि मानसिक शक्ती उपासने शिवाय प्राप्त होत नाहीं. म्हणून सर्व भारतीयाना सविनय विनंती आहे किं सर्वांनी घरोघरीं ही उपासना चालू ठेवावी व यातील शेवटचे गीत ही अनाथ जनता झाली, हे सामुदायिकपणे घरोघरी दररोज सायंकाळीं गायिले जावे. संहतिः कार्य साधिका या न्यायानें सामुदायिकपणें केलेली प्रार्थना व्यर्थ जाणार नाहीं हा विश्वास ठेवावा. उपासना हा आपल्या राष्ट्राच्या उन्नतीचा पाया आहे. जगातला प्रत्येक मनुष्य आस्तिक आहे. नास्तिक कुणीही नाहीं. तो फक्त बाह्य देखावा आहे. याची साक्ष प्रत्येकाचे मनच देईल. घरोघरी उपासना करा व शत्रूवर मात करा. विजयी व्हा. जय महाराष्ट्र.

—न. शा. कान्हे.

# –अनुक्रमणिका–


| विषय | पान |
|---|---|
| प्रथमावृत्तीची प्रस्तावना ... ... ... ... | २ |
| द्वितीयावृत्तीची प्रस्तावना ... ... ... ... | ३ |
| तृतीयावृत्तीची प्रस्तावना ... ... ... ... | ४ |
| अर्पणपत्रिका ... ... ... ... | ५ |
| सप्ताहक्रमपद्धती ... ... ... | ५ |
| प्रातःस्मरण ... ... ... ... | ६ |
| भूपाळी गणपतीची . ... ... ... | ६ |
| भूपाळी गंगेची ... ... ... ... | ७ |
| भूपाळी श्रीदत्ताची ... ... ... ... | ७ |
| सकष्टहरण स्तोत्र ... ... ... ... | ८ |
| अन्नपूर्णा मंत्र ... ... ... ... | ८ |
| संतति–संपत्ति–सौभाग्य मंत्र ... ... ... | ८ |
| करुणात्रिपदी-सायंप्रार्थना ... ... ... ... | ९ |
| आरती श्रीदत्ताची (गु. टेंबेस्वामी कृत) ... ... ... | १० |
| नाममंत्र व जपाची माहिती ... ... ... | १० |
| श्रीगुरुस्थानांची माहिती—करंजनगर ... ... ... | ११ |
| भिल्लवडी–नरसोबाची वाडी ... ... ... | ११ |
| गाणगापूर ... ... ... ... ... | १२ |
| श्रीगुरुचरित्रपद्यामृत दिवस १ ला ... .. ... | १३ |
| दिवस २ रा ... ... ... | २१ |
| दिवस ३ रा ... ... ... | ३० |
| दिवस ४ था ... ... ... | ३६ |
| दिवस ५ वा ... ... ... | ४४ |
| दिवस ६ वा ... ... ... | ५० |
| दिवस ७ वा ... ... ... | ५७ |
| पुरवणी ... ... ... ... | ६९ |


———

३७७७५ ... १६२८ ... ५।२।६५

ज्यांची मनोमन प्रेरणाच या ग्रंथनिर्मितीस कारण झाली त्या

श्री. ब्रह्मीभूत **वासुदेवानंद सरस्वती टेंबे**

श्री दत्तावतार स्वामीमहाराज

( सं. श्रीगरुडेश्वर, गुजराथ )

यांचे चरणीं

— नम्र बालक **नरहरी** यांजकडून नम्रपणे —

## — सादर समर्पण —

## — सप्ताहक्रम —

प्रथमदिन– १ ते ९ अध्याय । द्वितीयदिन– १० ते २१ अध्याय ।

तृतीयदिन–२२ ते २९ अध्याय । चतुर्थदिन– ३० ते ३५ अध्याय ।

पंचमदिन–३६ ते ३८ अध्याय । षष्ठदिन— ३९ ते ४३ अध्याय ।

सप्तमदिन–४४ ते ५३ अध्याय ।

**प्रतिदिनी ग्रंथपूजा व आरती, धूपदीप, प्रसाद करावा.**

दा. क्र. ४८०३

# श्रीदत्त उपासना

## प्रातःस्मरण

सकाळीं—कराग्रे वसते लक्ष्मीः करमध्ये सरस्वती ॥ करमूले तु सावित्री प्रभाते करदर्शनम् ॥ १ ॥ समुद्रवसनेदेवि पर्वतस्तनमंडले ॥ विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्वमे ॥२॥

मुखमार्जनानंतर—वक्रतुंड महाकाय कोटिसूर्यसमप्रभ ॥ निर्विघ्नं-कुरुमेदेव सर्वकार्येषु सर्वदा ॥१॥ गणनाथ सरस्वती रविशुक्र बृहस्पतीन् ॥ पंचैतासंस्मरेन्नित्यं वेदवाणी प्रवृत्तये ॥२॥ गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णुः गुरुर्देवोमहेश्वरः ॥ गुरुः साक्षात परब्रह्म तस्मै श्रीगुरुवेनमः ॥३॥ काषायवस्त्रं करदंडधारिणं कमंडलुपद्मकरेण शंखं ॥ चक्रंगदाभूषितभूषणाढ्यं श्रीपादराजं शरणं प्रपद्ये ॥४॥ कृते जनार्दनो देवः त्रेतायां रघुनंदनः ॥ द्वापारे रामकृष्णौच कलौ श्रीपादवल्लभः ॥५॥ मालाकमंडलुरधः करपद्मयुग्मे मध्यस्तपाणि यगुले डमरु त्रिशूले ॥ यस्यस्त उर्ध्वकरयोः शुभशंखचक्रे वंदेतमत्रिवरदं भुजषटकयुक्तम् ॥६॥ न वासुदेव भक्तानां अशुभं विद्यते क्वचित् ॥ जन्ममृत्यु जराव्याधिर्भयंनैवोपजायते ॥७॥ मंगलं भगवान् विष्णुः मंगलं गरुडध्वजः ॥ मंगलंपुंडरीकाक्षो मंगलायतनं हरिः ॥८॥

## भूपाळी गणपतीची

उठा उठा हो सकळीक ॥ वाचे सरावा गजमुख ॥ ऋद्धि सिद्धीचा नायक ॥ सुखदायक भक्तासी ॥ ध्रृ० ॥ अंगी शेंदुराची उटी, माथां शोभतसे कीरिटी ॥ केशर कस्तुरी लल्लाटी, कंठी हार साजिरा ॥१॥ कानी कुंडलाची प्रभा । चंद्रसूर्य जैसे नभा । माजी नागबंदी शोभा । स्मरतां उभा जवळी तो ॥२॥ कांसेपितांबराची घटी । हाती मोदकाची वाटी ॥ रामानंद स्मरतां कंठी ॥ तो संकटीं पावतो ॥३॥

## भूपाळी गंगेची.

उठोनिया प्रातःकाळीं, वदनीं वदा चंद्रमोळी ॥ श्री बिंदुमाधवाजवळी, करा स्नान गंगेचे ॥ करा स्नान गोदेचे ॥ धृ० ॥ स्नानदान जया अंतरी, घडेल भागिरथीच्या तीरीं ॥ हरि कृपा करिल त्यावरी ॥ ऐसे महात्म्य गंगेचे ॥ गोदेचे ॥ १ ॥ भागिरथिचे स्नान करा ॥ हृदयीं स्मरोनि गंगाधरा, चुकेल चौऱ्यायेशींचा फेरा ॥ ऐसे महात्म्य गंगेचे ॥ २ ॥ गंगा आहे स्वर्गावरतीं ॥ पाताळीं ते भोगावती। मृत्युलोकी हे विख्याती ॥ ऐसे महात्म्य गंगेचे ॥ ३ ॥ कृष्णावेण्या तुंगभद्रा ॥ शरयू कालिंदी नर्मदा ॥ भीमा भामा मुख्य गोदा ॥ करा स्नान गंगेचे ॥ ४ ॥ व्यास वाल्मिकि नारद मुनी ॥ अत्री वसिष्ठ आणि जैमिनी ॥ गुरुदत्त येती माध्यान्हीं ॥ ऐसे महात्म्य गंगेचे ॥ ५ ॥ आली आषाढि एकादशी ॥ चला जाऊ पंढरीसी ॥ पांडुरंग चरणापाशी ॥ दावी महात्म्य गंगेचे ॥ ६ ॥

## भूपाळी श्रीदत्ताची.

पहाटेसी उठोनी भक्त हर्षोनी चित्ती ॥ गुरुपदिं भेटायेतीसगळे सह्याद्री वरती ॥ घृ० ॥ कृतवीर्यात्मज सहस्रबाहू अर्जुन तो पुढती ॥ कयाधु सुत तो भागवतोत्तम प्रल्हादहि सुमती ॥ १ ॥ ययाति सुत यदु ज्याच्या वंशा देवहि वंदीती ॥ मदालसेचा नंदन चवथा अलर्क ज्या म्हणती ॥ २ ॥ सुतपानामक भूसुर मुनिवर विष्णु-दत्त सुमती ॥ अन्यहि येती सुरमौनिततीं करिती ते प्रणती ॥ ३ ॥ अनसूयेच्या बाळा दत्ता करितो तुजविनती ॥ उठिउठि विमला अरुण उदेला सरली हे राती ॥ ४ ॥ मंगल धामा घनःश्यामा उठी उठी निगुती ॥ अरुण उदेला प्रकाश पडला पक्षी गलबलती ॥ ५ ॥ कुंकुम माखुनी प्राचि कामिनी हर्षुनि आत्मपती ॥ येतो म्हणुनि ये लगबगिने लोटित तम पुढती ॥ ६ ॥ द्विजालि उठति वेदां पढती वासुदेव प्रार्थी ॥ उठि उठि दत्ता श्रीगुरुनाथा दावी मुखदीप्ती ॥ ७ ॥

## संकष्टहरण स्तोत्र.

( स्नानानंतर पूजा झाल्यावर व सायंकाळी. )

श्रीपाद श्रीवल्लभत्वं सदैव ॥ श्रीदत्तास्मान् पाहि देवाधिदेव ॥ भाव ग्राह्य क्लेशहारिन् सुकीर्ते घोरात् कष्टा दुद्धरास्मान् नमस्ते ॥ १ ॥ त्वंनोमाता त्वंपिताप्तो ऽधिपस्त्वं । त्राता योग क्षेम कृत् सद्गुरुस्त्वं ॥ त्वंसर्वस्वंनोप्रभो विश्वमूर्ते । घोरात् ॥ २ ॥ पापंतापंव्याधिमाधिंच दैन्यं । भीतिं क्लेशंत्वंहराशु त्वंदन्यं ॥ त्रातारंनो वीक्ष ईशास्तजूर्ते ॥ घोरात् ॥ ३ ॥ नान्यस्त्राता नापिदाता न भर्ता ॥ त्वत्तोदेव त्वंशरण्योक हर्ता ॥ कुर्वात्रेयानुग्रहं पूर्णराते घोरात् ॥ ४ ॥ धर्मे प्रीतिं सन्मतिं देवभक्तिं । सत्संगाप्तिं देहि भुक्तिंच मुक्तिम् ॥ भावासक्तिं चाखिला नंदमूर्ते ॥ घोरात् ॥ ५ ॥ श्लोकपंचकमेतत् यो लोकमंगल वर्धनम् ॥ प्रपठेन्नियतोभक्त्यास श्रीदत्त प्रियो भवेत ॥ ६ ॥ इतिश्रीमत प. प. वासुदेवानंद सरस्वतीविरचितं संकष्टहरणं स्तोत्रं संपूर्णम् ॥

## अन्नपूर्णा मंत्र.

संकल्प—( आचम्य ) ममाभीष्ट सिद्धिद्वारा श्रीपरमेश्वर प्रीत्यर्थं श्री अन्नपूर्णा मंत्र जपमहंकरिष्ये ॥ ( जप संख्या २८ लक्ष ) जेवणापूर्वी दररोज १ माळ तरी करावी.

मंत्र—ॐ नमो भगवति माहेश्वरि अन्नपूर्णे ममाभिलाषितमन्नं देहि देहि ॥ (बायांनी ओंम् सोडावा ).

## ॥ संतती-संपत्ती व सौभाग्यदायक मंत्र ॥

संतती—दूरी कृत्य पिशाचार्तिं जीवयित्वा मृतं सुतं ॥
योऽभूदभीष्टदः पातु स नः संतति वृद्धिकृत् ॥ १ ॥

संपत्ती—दरिद्र विप्रगेहेयः शाकं भुक्त्वोत्तम श्रियं ॥
ददौ श्री दत्तदेवः स दारिद्र्यात् श्रीप्रदोऽवतु ॥ २ ॥

सौभाग्य—जीवया मास भर्तारं मृतं सत्याहि मृत्यु हा ॥
मृत्युंजयः स योगींद्रः सौभाग्यं मे प्रयच्छतु ॥ ३ ॥

( वरील तीनही श्लोकांची प्रत्येकीं १ माळ तरी दररोज करावी. ज्याची जरूरी जास्त तो जप जास्त करावा. )

## सायंकाळीं करावयाची प्रार्थना; करुणा त्रिपदी

( प्रत्येकानें देवासमोर बसून दररोज प्रार्थना करावी. )

पद १ लें ( चालः—उद्धवा शांतवन कर जा. )

शांत हो श्रीगुरुदत्ता । मम चित्ता शमवी आता ॥ धृ० ॥ तू केवल माता जनिता ॥ सर्वथा तूं हितकर्ता ॥ तूं आप्त स्वजन भ्राता ॥ सर्वथा तूंचि त्राता ॥ चाल ॥ भयकर्ता तू भयहर्ता ॥ दंडधर्ता तूं परिपाता ॥ तुजवाचुनि न दुजी वार्ता ॥ तूं आर्ता आश्रयदत्ता ॥ १ ॥ अपराधास्तव गुरुनाथा ॥ जरि दंडा धरिसि यथार्था ॥ तरि आम्ही गाउनि गाथा ॥ तवचरणी नमवू माथा ॥ चाल ॥ तू तथापि दंडिसि देवा ॥ कोणाचा मग करु धावा ॥ सोडविता दुसरा तेव्हां ॥ कोण दत्ता आम्हा त्राता ॥ तूं नटसा होउनि कोपी ॥ दंडिताहि आम्ही पापी ॥ पुनरपिही चुकत तथापि ॥ आम्हावरि नच संतापी ॥ चाल ॥ गच्छतः स्खलनं क्वापी ॥ असे मानुनि नच हो कोपी ॥ निज कृपा लेशा ओपी ॥ आम्हावरि तूं भगवंता ॥ शांत हो ॥ ३ ॥ तव पदरी असता ताता ॥ आडमार्गी पाऊल पडता ॥ सांभाळुनि मार्गावरता ॥ आणिता न दुजा त्राता ॥ चाल ॥ निज बिरुदा आणुनि चित्ता ॥ तूं पतित पावन दत्ता ॥ वळे आता आम्हा वरुता ॥ करुणाघन तूं गुरुनाथा ॥ शांत हो ॥ ४ ॥ सहकुटुंब सहपरिवार ॥ दास आम्ही हे घरदार ॥ तवपदी अर्पु असार ॥ संसारा हित हा भार ॥ चाल ॥ परि हरिसी करुणा सिंधो ॥ तूं दीनानाथ सुबंधो ॥ आम्हा अघलेश न बाधो ॥ वासुदेव प्रार्थित दत्ता ॥ शांत हो ॥ ५ ॥

पद २ रें ( चाल—इस तन धनकी )

श्रीगुरु दत्ता जय भगवंता ॥ ते मन निष्ठुर नकरी आता ॥ धृ० ॥ चोरे द्विजासी मारिता मनजे ॥ कळकळले ते कळकळो आता ॥ १ ॥ पोटशूळाने द्विजतडफडता ॥ कळकळले ते कळकळो आता ॥ श्रीगुरुदत्ता ॥ २ ॥ द्विज सुत मरता काकुळती येता ॥ वळले तेमन नवळे किं आता ॥ ३ ॥ सति पति मरता काकुळति येता ॥ वळले तेमन नवळे आता ॥ ४ ॥ श्रीगुरुदत्ता त्याजि निष्ठुरता ॥ कोमल चित्ता वळवी आता ॥ ५ ॥

पद ३ रें ( चाल—इक तन धनकी )

जय करुणा घन निज जन जीवन ॥ अनसूयानंदन पाहि जनार्दन ॥ जयकरुणाघन ॥ धृ० ॥ निजअपराधे उफराटी दृष्टी ॥ होवुनि पोटीं भय धरु पावन ॥ १ ॥ तूं करुणाकर कधि अम्हावर रुसशी न किंकर वरद कृपाघन ॥ २ ॥ वारी अपराध तूं मायबाप ॥ तवमनीं कोप लेशन वामन ॥ ३ ॥ बालकांपराधागणी जरी माता तरी कोण त्राता देइल जीवन ॥ ४ ॥ प्रार्थीवासुदेव पदीं ठेवा भाव ॥ पदीं देवो ठाव देव अत्रिनंदन ॥ ५ ॥

## आरती श्रीदत्ताची.

( श्री. टेंबे स्वामी कृत )

आरति ओवाळू । अनसूया । तनया दत्तात्रेया ॥ आरति ओवाळू ॥ धृ० ॥ सर्वांतरिंचें जे । निजगूज । साक्षी भूतचि तेज ॥ संसार वृक्षाचे, आद्यबिज । तो हा सद्गुरुराज । विरज ब्रह्मजया म्हणाति तया । श्रीगुरुदत्तात्रेया ॥ १ ॥ सात्वीक हृदय हे । आरती । तेजकर्मांच्या वाती ॥ विवेक स्नेहाने, त्यानिगुती भिजवूनि ज्ञानज्योति । पाजळूनि पेटविल्या । ओवाळाया ॥ श्रीगुरु-दत्तात्रेया ॥ २ ॥ आरती उजळीता । या चित्तामध्ये तिळभर ध्वांता । वावहि नच मिळता । दृष्यता आलि निमेषन हाता । सोहंप्रकाश हा । हो सखया ॥ श्रीगुरु ॥ ३ ॥ प्रकाश आरतीचा । हा थोर । सबाह्य अभ्यंतर । मी तूं पण हाचि । अंधकार । जाळुनि झळके फार । वेगळा वासुदेव । तेथूनिया । नोहे दत्तात्रेया ॥ ४ ॥

## ॥ कांहीं नाम जपांचे मंत्र व कोटी जपांची माहिती ॥

१ ] दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा

२ ] श्रीराम जयराम जय जय राम

३ ] श्रीदत्त, श्रीकृष्ण, श्रीअंबा, जय हनुमान, श्रीविठ्ठल

३७७७५
१६७८
५१७१.८२।
५४२१६

१ ल्या कोटीत तनुस्थान शुद्धी, स्वप्नात देव, संताचे दर्शन सुविचार.

२ कोटी जप पूर्ण झाल्यावर धन स्थान शुद्धी, प्राप्ती वाढेल,

३ ऱ्या कोटीत भावंडाकडून सुख प्राप्ती,

४ थ्या कोटीत माता पित्या पासून सुखप्राप्ती, मातृसुख लाभ.

५ व्या कोटीत पुत्रकन्या संतती प्राप्ती.

६ व्या कोटीत रोगांचा पूर्ण नाश, व शत्रूंचा पराभव.

७ व्या कोटीत लग्नाचा योग, पतीपत्नीचे भांडण मिटेल.

८ व्या कोटीत गुप्तधन प्राप्ती, अकस्मात् द्रव्यलाभ.

९ व्या कोटीत मंत्रदेवतेचे प्रत्यक्ष दर्शन होईल.

१० व्या कोटीत पितृसुख गृहप्राप्ती, स्थावर इस्टेट.

११ व्या कोटीत मंत्रदेवतेची पूर्ण कृपा,

१२ व्या कोटीत तीर्थ यात्रा, सिद्धी प्राप्ती.

कोणत्याही मंत्राचा बारा कोटी जप पूर्ण झाला म्हणजे जन्म पत्रिका पूर्ण शुद्ध होते. आणि वरील अनुभव येतात. नियमपूर्वक मोजून एखाद्या वहीवर मांडून दररोज करित रहावे. इति.

# ॥ श्रीगुरुस्थानांची माहिती ॥

१ ] **नृसिंह सरस्वती स्वामी :** जन्मस्थान करंज नगर ( लाडाचे कारंजे ) वऱ्हांडात आहे, मूर्तिजापूरहून गाडी छोटी लाईन आहे. जन्मस्थी सुंदर मंदीर व उतरण्यासाठीं धर्मशाळा वगैरे सोयी आहेत.

२ ] भिलवडी–मिरजेच्या जवळ कृष्णानदीच्या काठी आहे. इथे महाराज कांहीं दिवस राहून नंतर नरसोबाचे वाडीस गेले. इथेही धर्मशाळा वगैरे बांधून ठेवल्या आहेत. यालाच औदुंबर क्षेत्र म्हणतात. रेल्वे स्टेशन आहे.

३ ] **नरसोबाची वाडी** : हा गांव कोल्हापूर स्टेट् मधला आहे. मिरजेला उतरून कोल्हापूरच्या गाडीत बसावे. पहिलेच स्टेशन जयसिंगपूर रोड आहे. ( हेच गुरु चरित्रांतील शिरोळ होय ) इथून चार मैल नरसोबाची वाडी आहे. मोटारीची सोय आहे. कृष्णा पंचगंगेच्या सुंदर संगमावर हा गांव असल्यामुळें शोभा अवर्णनीय आहे. उतरण्यासाठीं धर्मशाळा आहेत. पुजारी लोकांची घरें बरीच असल्यामुळें यजमानाना त्यांचेकडेही उतरता येते.

४ ] **गाणगापूर** : हे क्षेत्र भीमा नदीच्याकाठीं आहे. २ मैलावर भीमा अमरजा संगम आहे. मद्रास मेल अथवा पॅसेंजरनें गाणगापूरला जाता येते. स्टेशन गाणगापूर आहे. १५ मैल स्टेशनापासून गांव दूर आहे. मोटारींची सोय आहे. धर्मशाळा आहेत. पुजारी आपल्या घरीही भाविकांची उतरण्याची सोय करतात. सोलापूरपासून ९–१० स्टेशने पुढे आहे. कलियुगांत शीघ्र प्रसन्न होणारी देवता म्हणून श्रीदत्तात्रयांची प्रसिद्धी आहे. भाविकांनी अवश्य दर्शनाला जावे; अष्टतीर्थ–कल्लेश्वर वगैरे स्थळे पाहवीत. दर गुरुवारी सणाला पालखीचा सोहाळा अपूर्व असतो. भाविकांना पालखी-महापूजा-ठरलेली रक्कम देऊन करविता येते; इथूनच महाराज श्रीशैल्य पर्वताकडे गेले. व गंगेत पुष्पासनावर बसून जातांना भक्तांनी पाहिलें. श्रीनृसिंह सरस्वती-स्वामी महाराजांनी गाणगापुरांत आपल्या निर्गुण पादुका ठेवल्या आहेत. त्यांचे दर्शन, पूजन हे येथील महत्वाचे कार्य आहे. त्यांची पूजा अष्टगंध, चंदन, कस्तुरी-तुळसीपत्र इत्यादि द्रव्यानीं होते. पाण्याचा स्पर्श नाहीं. इत्यलम् ॥

# ॥ श्रीगुरुचरित्र पद्यामृत ॥

ग्रंथ पुढें ठेऊन प्रथम पूजा करावी.

## प्रार्थना

काषायवस्त्रं करदंड धारिणं । कमंडलुं पद्मकरेण शंखं ॥ चक्रं गदा भूषितभूषणाढ्यं । श्रीपादराजं शरणं प्रपद्ये ॥ १ ॥ कृते-जनार्दनोदेव स्त्रेतायां रघुनंदनः ॥ द्वापेरे रामकृष्णौचकलौ श्रीपाद वल्लभः ॥ २ ॥ मालाकमंडलु रधः करपद्मयुग्मे मध्यस्थ पाणि युगुले डमरुत्रिशूले ॥ यस्यस्त उर्ध्व करयोः शुभशंखचक्रे वंदे तमात्रिवरदं भुजषट्क युक्तम् ॥ ३ ॥

## दिवस पहिला

### अध्याय पहिला—पद्य १ ले—श्रीगणेशस्तवन

( राग—भूप ताल—त्रिताल )

वंदू गजवदना ! प्रभुवरा। गिरिजासुत तूं विघ्नविनाशक ॥ दुरित निवारक मूषक वहना ॥धृ॥ प्रार्थी दास तुझा गुरुराया ॥ स्फूर्ती देई कवन कराया ॥ गुरुचरितामृत सुरसवदाया ॥ ये मम मन सदना ॥१॥ तव कृपेचा आश्रय मिळता ॥ मनोरथीं मज मिळे सफलता ॥ कृष्णाग्रज हा नम्र शिरसुता ॥ करवी नवरचना ॥ प्रभुवरा ॥२॥

### अध्याय १ ला—पद्य २ रे—सरस्वतीस्तव.

( चाल—काल हा घाला घालितो )

शारदा माते तुज नमो ॥ विमल मती दे या कवनी मज ॥ गुरु चरितामृतक्रमो । वगविगे माते ॥धृ॥ अल्पमती मी बोबडबोली ।

इच्छितसे गुरु साउली ॥ आश्रय तुझा मिळता माउलि ॥ होईल सफल श्रमो ॥१॥ बैसुनिया मम मुखी अंबिके ॥ वदवी गुरुलीलेसि कौतुके ॥ ओति मम मुखी कृपा मातुके ॥ श्रवणी सुजन रमो ॥२॥ कृष्णाग्रज हे दीन लेकरूं ॥ याचितसे पसरोनि पदरु ॥ विफल याचना नको मम करु ॥ जीवीतसफल गमो ॥ शारदा माते ॥३॥

अध्याय १ ला—पद्य ३ रे—श्रीगुरु स्तुती

( चाल—श्रीधरा, मदन सुंदरा )

गुरुवरा, तुझा आसरा, देई पामरा, असेतवदास, असेतवदास, म्हणवितो दयाळा मजविशि होनउदास ॥धृ॥ शिष्यतो नाम धारक, धन्यसेवक, गुरुबालेक, सिद्धगुरुरुपे, सिद्धगुरुरुपे ॥ बोधिले तया गुरुचरित सुरस आणि सोपे ॥ गायनी, प्रेम तवमनी, असे जाणुनी, तोच अनुवाद । तोच अनुवाद ॥ कवनी गुंफुनिया द्यावा सुजना मोद । हा मना एकवासना, मम दयाघना, नसो लवगर्व, नसो लवगर्व ॥ कवने या तोषो ब्रह्मजनार्दनशर्व ॥

( चाल बदलून )

माउली जगाची माझी कुलदेवता ॥ तुजला जगदंबा प्रसन्न होवो अता ॥ राखील पाठ ती माझी गुरुदेवता ॥ गुरु वासुदेव यतिवरा, नमोनी त्वरा, कृपेचा झरा, याचितो वरा, असो तव खास, असो तव खास ॥ कृष्णाग्रजवत्सा करा साह्य समयास ॥१॥

अध्याय १ ला—पद्य ४ थें

( चाल—भला जन्महा तुला लाधला )

चार युगाची रचना विविध घोर केली शेवटी ॥ पाडितो सुजना बहु संकटी ॥धृ॥ धर्मा धर्म विचार न उरला अनर्थकारक कली । करि दया धूर्ती दुर्जनि खलीं ॥ पाहुनिया गुणधर्म तयाचे प्रगट करी मार्ग हा ॥ कलियुगी तारक सकला महा ॥ चाल ॥ जो स्मरेल गुरुच्यापदा जाति आपदा ॥ नामस्मरणी देणार सर्व संपदा ॥ संसृती कधिच त्या होईल ना तापदा ॥ अनन्यभावे स्मरतां पावे ग्रंथा वरदान हे ॥ गुरुने दिधले गा निर्भये ॥१॥ सिद्ध नामधारक संवादी अपूर्व रस माधुरी ॥ सेविली संत सज्जनी खरी ॥ स्त्रीशूद्रादिक मात्र पारखे होते म्हणुनी नवा ॥ ग्रंथ हा कवन रुप जणु खवा ॥ श्रीगुरुची प्रेरणा जाहली वदविणार गुरुमुनी ॥ संशयो किमपिन घ्यावा मनी ॥ चाल ॥ गाईल नित्य प्रेमाने जो आदरे ॥ सप्ताह क्रमे वाचिता सहज भवतरे॥ गुरु कृपामृताचे अनंत लाभति झरे ॥ भक्तिभाव हा तारक ठेवा विश्वासचि गुरुपदी ॥ करारे अवगाहन यामधी ॥२॥ धाव पाव गुरुवरा दयाळा गाइन तव गुण अता ॥ करी अपराध क्षमा पदनता ॥ हाक ऐकता धावत आले सद्गुरु वरदायक ॥ सिद्ध रुप उभे दिसतीसन्मुख ॥ आनंदे नमला गुरुचरणी शिष्य नामधारक ॥ सिद्ध मग कुरवाळिति तन्मुख ॥ गुरुलीला सेवा वदा म्हणे सुततया ॥ ते सांगति त्यावरि करुनी प्रेमे दया ॥ संतोष होतसे पीता सुमधुरपया ॥ प्रथमाध्यायीं गुरुपद भेटी शिष्य तुष्ट अंतरी ॥ कथा मग प्रारंभिती साजिरी ॥३॥

## अध्याय २ रा—पद्य ५ वें

( राग—यमन ताल—त्रिताल )

कलियुगि तारक पाय गुरुचे ॥ धृ ॥ चहुयुगि नानाविध त्या साधानि ॥ मिळविति श्रीहरिराय ॥१॥ कलियुगि श्रद्धानाम स्मरणी ॥ कथिला सुलभ उपाय ॥२॥ काशीपुरि संदीपक शिष्ये ॥ वेदधर्म गुरुराय ॥३॥ नानारीती छलहि सोसुनी ॥ सेवियली गुरुमाय ॥४॥ प्रसन्न झाले विष्णु सदाशिव । नेघेवर सुतराय ॥५॥ निष्ठा श्रीगुरुचरणि तयाची । सोडिन गुरुचे पाय ॥६॥ सत्व पाहुनी बहु दिवसावरि ॥ दिव्य धरी गुरु काय ॥७॥ हृदयि धरोनि शिष्या मोदे ॥ सुखविति-चुकविति हाय ॥८॥ कृष्णाग्रज गुरुलीलामृत हे ॥ करनी सुमधुर गाय ॥९॥

## अध्याय ३ रा व ४ था—पद्य ६ वें

( चाल—चंद्रकांत राजाची कन्या )

शिष्य मुदितगुरुवरा प्रार्थीमग गुरुलीलामृत मजसिवदा ॥ सिद्ध म्हणे बा ऐकलेकरा कथा दुरितहर सौख्य प्रदा ॥धृ॥ धनपुत्रादिक सकलमनोरथ श्रवणी गानी पुरतीलरे ॥ जन्ममृतीफेरे भयदायक सहज ऐकता चुकतिलरे ॥१॥ अनंत अवतारी करिलीला त्यात प्रथम दत्तात्रयरे ॥ अत्रि अनसुया गृही जन्मघे देवगुरु ते एकखरे ॥ शुद्ध बिजापोटी फळे गोमटीच येति हे तत्त्व खरे ॥ अवतरुनी सतिगृही दाविले नवल जगा निज कृपा वरे ॥ सति अनसूया सत्व पहाया आले झाले तत्पुत्र ॥ अत्रि ऋषी

अति हर्षित झाले भक्तचि होय कृपापात्र ॥ ब्रह्मा विष्णु महेशात्मक हा त्रिमूर्ति झाला प्रभूखरे ॥ त्रिगुणात्मक मी त्रिजगि एकमी अभेदरुपे दावि खरे ॥ स्थिरचर व्यापक असा सुखद स्मरताचि धाव घे दत्तगुरु॥ दत्त दत्त उच्चारि निरंतर हृदयि तयाच्या होय स्थिरु ॥ अंबरीष नृप एकादशि व्रति दुर्वासा छल करु आला ॥ चक्रसुदर्शन भयेत्रस्त तो कुणि न वाचवी त्या मुनिला ॥ भक्तांचा अभिमानी प्रभु हा असें दाविलें चरित महा ॥ कृष्णा ग्रज हा दास तयाचा करुनि गाय प्रभुराय महा ॥२॥

अध्याय ५ वा—पद्य ७ वें

( चाल—नरजन्मामधि नरा करुनि घे )

अनंत रूपें प्रभु हा नटला जगताराया घरी ॥ किती अवतार हरी भूवरी ॥धृ॥ दशावतारी दुर्जन मारुनि निज भक्तां तारिले॥ प्रथित हें चरित पुराणी भलें ॥ पीठापुरिची आपळ राजा सुमता भार्या तया ॥ उदरि ये प्रभू जनन घ्यावया ॥चाल॥ श्राद्धदिनी भिक्षा घालीती सुंदर ॥ येतो तव उदरी मीच म्हणे सुतवर ॥ आशिर्वच देवुनि गुप्त होय श्रीधर ॥ जगत्कार्य करण्या प्रभु येती लीला नाटकि खरा ॥ म्हणवि श्रीपाद वल्लभो वरा ॥१॥ बारा वर्षे सुता जाहली विवाह योजिति मनी ॥ तो म्हणे विराग मज कामिनी ॥ पुत्र पांगळे दोन पूर्विचे होते कृपया तया ॥ पाहता करिति सुदृढ निर्भया॥ सुंदर काया तया तशी ती विद्या सकलहि आली ॥ गुरु कृपा पूर्ण फळाला आली ॥ चिंतामणि

स्पर्शे सुवर्ण अय होतसे ॥ लोकही पाहुनी कुतुक करिति फारसे। मग माता पितरा पुसुनि निघाले कसे ॥ आले काशीपुरी श्रीगुरु निश्वेश्वर दर्शना ॥ लोकही करिती तद्दर्शना ॥२॥

अध्याय ६ वा—पद्य ८ वें

( चाल—दिंडी ताल—दादरा )

क्षेत्र भूवरिया प्रथित धेनुकर्ण ॥ महाबल नाम असे दिव्यवर्ण ॥ शंभु देवे होवूनी सुप्रसन्न ॥ दशग्रीवाला दिले आत्मदान ॥१॥ गजानन हस्ते स्थापना तयाची ॥ सिद्ध झाली ही प्रथित कथा-साची। किती भक्तां पावला शंभुराणा ॥ अजुनि जनयेति दर्शना सुजाणा ॥२॥

अध्याय ७ वा—पद्य ९ वें

( चाल फटका )

कवणा झाला प्रसन्न प्रभु हा चरित तयाचे मजसांगा ॥ शिष्य-वराच्या प्रश्नांवदती उत्तर धरुनी अनुरागा ॥धृ॥ मित्रसह नृपा ब्राह्मग हत्या घडलि पुराणी प्रथित कथा ॥ शरण पातला गोकर्णी तो गेलि तयाची सकल व्यथा। उदार शंकर महापातकी चांडालीसहि निजधामी ॥ नेई असा लौकिक पसरला अमित धावले जनकामी ॥ अभय दान द्यावया वरद कर भक्तांची पाहे वाट ॥ श्रीगुरु आले गोकर्णाला रमले पाहुनि तो थाट ॥ तिथुनि निघाले कुरव पुराला कथा गुरुची पुढे असे ॥ कृष्णाग्रज हा विनवित सुजना पद्यामृत हे प्याच कसे ॥१॥

अध्याय ८ वा—पद्य १० वें

( चाल—अहो मी माया )

-कुरव पुर क्षेत्रीं । येति योगिराज । तारण्या अज्ञ जन समाज ॥धृ॥ रम्य संगमतो । कृष्णा भीमेचा । निसर्गहि शोभवि त्या साचा॥ मनोहर स्थान, तप करण्यायोग्य । जागवी हृदयी वैराग्य ॥ राहिले स्वामी । अशा रम्य जागी ॥ ज्यांच्या चित्ति दया जागी ॥ तया कुरवपुरी ॥ विप्रपुत्रमूढ ॥ पितात्यापढवी सुमतिदृढ ॥ नये त्या काही । व्यर्थ भार पोटी । जन्मला विद्यानच ओठीं ॥ विचारविप्र । चिंता करित असा ॥ पावला पंचत्वासहसा ॥ लोक निंदिती । मूर्ख-बालकाला ॥ माय सुत येति शरण गुरुला ॥ गुरु तया देती । शनि प्रदोषव्रत । सुता त्या करि विद्यावंत । अशक्य न माझ्या ॥ गुरुनाथा काही । आठवा प्रेमे ही ग्वाही ॥१॥

अध्याय ८ वा—पद्य ११ वे .

( राग—केदार ताल—त्रिताल )

शिव पूजनि द्रवला ॥ तयाला, कथा रुचिर सांगती श्रीगुरु ॥ उभया माय मुला ॥धृ॥ उज्जयनीप्रति चंद्रसेननृप ॥ शनि प्रदोषां पाळी करि तप ॥ नित्य करी शिवपंचाक्षरी जप ॥ पूजि उमा पतिला ॥१॥ -कोटि सूर्य सम प्रकाश दाता ॥ चिंतामणि प्रभु अर्पी भक्तां ॥ सुवर्ण करि लोहास तत्वता ॥ जन करिती नवला ॥२॥ टपले राजे हराया त्या ॥ सेना वेढिति नगरा भवत्या ॥ शनिप्रदोष होता दिवशी त्या ॥ नृप पूजनि रमला ॥३॥ पूजा पहाति किति नरनारी ॥ होते तयातचि गोप सुंदरी ॥ पचाब्दवयी सुतहि कडेवरि ॥ पाही तनय भला ॥४॥ तशीच

पूजा घरि येवुनी करि ॥ प्रस्तर मांडुनि ध्यान अंतरी ॥ तन्मय होवुनि शिव अभ्यंतरि ॥ जागृत करि वहिला ॥५॥ माता येवुनि पूजा फेकी ॥ परी त्यजीना अपुली नेकी ॥ प्रगट होवुनी शंभु विलोकी ॥ कृपादृष्टि बाळाला ॥६॥ मंदिर अपुलेस्वयेउभविलें ॥ स्वयेचि शंकर त्यात राहिले ॥ सुता म्हणति बा तवभक्तिबले ॥ आलो तुजजवळा ॥ चमत्कार हा इतरां राया ॥ कळता आले नवल पहाया ॥ चंद्रसेननृप स्वागति राया ॥ तोषवि त्या सकला ॥८॥ वैर सोडुनी मोदे बघती॥ श्री शिव सेवा सफल प्रचीती ॥ कृष्णाग्रज करि सकला विनती ॥ गाया गुरुचरिताला ॥९॥

अध्याय ९ वा—पद्य १२ वें (फटका)

अद्भुत महिमा गुरुगंगेचा चरण रजी जो करि स्नान ॥ धन्य होय त्रिजगात गायनी करील जो गुरु गुणगान ॥धृ॥ कुरवपुरी गुरु असता झाली कथा सुरस सज्जन परिसा ॥ रजकहीन कुळी जन्मुनि झाला कृपापात्र ऐकाच कसा ॥ नित्यनमी गुरुपदाब्दद्भुतो एके दिनि गुरु वदति तया ॥ काय मागणे तुझे मागरे देईन तुजवरि करुनि दया ॥ त्यासमयी जलि क्रीडत होतो म्लेंच्छ भूप त्या पाहुनिया ॥ वाटे हे ऐश्वर्य असावे-पुढिले जन्मी गुरुसदया ॥ हासुनि बोलति तथास्तु भेटू पुढील जन्मी तुजलागी ॥ बेदर नगरी राज्य दिले तुज आशिर्वच वदले योगी ॥ नको उपाधी गुप्त असावे म्हणुनि होति मग अदृष्य ॥ सेवा करितां भक्तां पावति अजुनि असे तेथ साक्ष ॥

रजकाची ती कथा पुढें येणार असे बहुसुखदाई ।। अनन्य शरणा अशी पावते प्रेमळ भक्तां गुरुमाई ।। विश्वासे गाईल कथामृत सप्ताह क्रमी प्रथम दिनी ।। कृष्णाग्रज करि गान तयाचे अल्पमतीने या कवनीं ।।१।।

॥ प्रथम दिन समाप्त ॥

यानंतर आरती मंत्रपुष्प करावा. सातही दिवस नित्य वाचन झाल्यावर हा क्रम चालू ठेवावा. आरती आधी ७ पानावर दिली आहे. रात्री शुचिर्भूतपणें स्वच्छ व धौत शयनावर झोपावे. दृष्टांत झाल्यास एखाद्या सज्जनाकडून अर्थ समजून घ्यावा.

## दिवस दुसरा

अध्याय १० वा—पद्य श्लोक—अभंग

कुरवपुर क्षेत्र सिद्ध स्थान जाण ।। राहिले सुजाण गुरु तेथे ।।१।। नाना भक्त येती दर्शना कराया ।। पूजुनी गुरुराया तोषवीती ।।२।। नवसाते पावती कन्या पुत्र देती ।। झाली ऐशी ख्याती भूमंडळी ।।३।। होता भक्त एक व्यापारी ब्राह्मण ।। करी मनी पण दर्शनाचा ।।४।। झालि बहु प्राप्ती माझिया व्यापारी ।। पूजिन कुरवपुरी गुरुराज ।।५।। देव नाहीं दूर हृदयीच राहे ।। मात्र वाट पाहे वासनेची ।।६।। पावला श्रीगुरु उदीम सफल झाला ।। फेडाया निघाला नवस वेगी ।।७।। द्रव्यभार संगे चोरा कळे मात ।। गाठिती मार्गांत तयालागी ।।८।। मारुनी तयाते द्रव्य घेती सारे ।। पातले सामोरे गुरुराज ।।९।। निज त्रिशूलाने मारिले तस्कर ।। एक भ्याला चोर शरण आला ।।१०।। देवुनी विभूती तया म्हणे नाथ ।। जीववी सनाथ

भक्त माझा ॥११॥ स्वये झाले गुप्त भक्त हो जिवंत ॥ कथा सद्गदित सांगे चोर ॥१२॥ आले मग दावे तया कुरवपुरा ॥ पूजिति गुरुवरा, प्रेमभावे ॥१३॥ प्रसन्न जयासी होती गुरुराय ॥ यमही अपाय न करी त्यासी ॥१४॥ कृष्णाग्रज विनवी दास सद्गुरुचा ॥ सज्जन हो वाचा पद्यामृत ॥१५॥

अध्याय ११ वा—पद्य २ रे

(चाल—फटका)

श्रीगुरु ते अवतरले पुढती करंज नगरी विप्रगृही ॥ शनिप्रदोषव्रत पुण्ये झाली ब्राह्मणपत्नी धन्य मही ॥धृ॥ माधवनामा पिता सोहळा जन्मसमयि बहु करीतसे ॥ जन्मतांच ॐकार वदे सुत करिति नवल जन अद्भुतसे ॥ ज्योतिषि आले भविष्य वदती होइल हा सुत जगद्गुरु ॥ सर्व वासना पुरतिल तुमच्या भक्तांचा हा कल्पतरु ॥ स्तनी दुग्ध ना मातेच्या सुत पाहि कृपादृष्टि तिकडे ॥ अपार आले पय दाटुनिया ओवाळिति सत्सुत रुपडे ॥ सात वर्ष वय झाले परि ओंकाराविण सुत नच बोले ॥ दुःख करी जननी अतिशोके मुका होय सुत दैवबळे ॥ बाळ खुणेने दावी उपनयना नंतर मी बोल वदे ॥ लोक वदति गायत्री मंत्राचा मुका कसा उच्चार वदे ॥ परि उपदेशी गायत्रीच्या चार वेद म्हणुनि दावी ॥ लीला गुरुची अद्भुत सारी अल्प मते केवी गावी ॥ निघे जावया काशीपुरिते मात पिता म्हणती बाळा ॥ आशा आमुची व्यर्थ करिशि कां वृद्धपणीच्या प्रतिपाळा ॥ चार पुत्र तुज होतिल माते कन्या एक

तशी सुगुण ॥ ते सुख देतिल तुज वृद्धपणीं–पूर्व जन्मिचे दे स्मरण ॥ श्रीपाद श्रीवल्लभ जाणुनि नमन करिति तत्पद-कमला ॥ कृष्णाग्रज गुण गाय तयाचे आळवि नम्रत्वे विमला ॥१॥

अध्याय १२ वा—पद्य ३ रें
(चाल—अजि अक्रुर हा.)

मम सुतराया टाकुनि कारे जाशी ॥करुणा नच ये तुज कैशी ॥धृ॥ करि लग्न आधी सुत होता मग जाय ॥ चुकवी बा माझी हाय ॥ हसुनी वदले कोण कुणाचा माते ॥ दो दिवसांचे हें नातें ॥चाल॥ मज न लगे गृहधनदारा ॥ संसृतिचा नको पसारा ॥ ही फसवी मोहक कारा ॥ संन्यास बरा प्रभुगुणगान कराया ॥ भवसिंधू सहज तराया ॥१॥ विनवी परती राहे कांही दिवस ॥ सुत होता पुरतील नवस ॥ जननी इच्छा पुरवाया गुरु राहे ॥ जववरी दोन सुत लाहे ॥ आशिर्वच दे अखंड धन कण वृद्धी ॥ सौख्य सर्व पावा सिद्धी ॥ चाल ॥ पातले त्वरित काशीस ॥ घेतला झणी संन्यास ॥ श्रीकृष्ण सरस्वति यास ॥ दीक्षा देती नृसिंह सरस्वति नामें ॥ जन भजती किति सुप्रेमे ॥२॥ बहुशिष्यहि ते झाले गुरुचे दास ॥ राहिले जवळि सेवेस ॥ तीर्थ क्षेत्रें पावन करण्या निघती ॥ शरणागत जन उद्धरती ॥ जैशी ज्याची भक्ति तसा गुरु पावे ॥ संकटि स्मरणीही धावे ॥ चाल ॥ ब्रीदचि हे गुरुरायाचे ॥ जो शरण अनन्याचि याचे ॥ क्षणि दैन्य हरी भक्तांचे ॥ कल्पित पुरवी कल्पतरुचा बाणा ॥ चालवी हा जगि गुरु राणा ॥३॥

### अध्याय १३ वा — पद्य ४ थें
(राग—काफी ताल—त्रिताल)

परतुनि पुनरपि आले निजगृही ॥ मातापिता भेटति आनंदे ॥ बंधु भगिनिसह रमले ॥धृ॥ निज भागिनांचे दैव सांगूनी ॥ उपाय त्यावरि वदले गुरुमुनि ॥ पाप विनाशी तीर्थी भगिनी ॥ जातील दोष भले ॥१॥ पतिपत्नीमधि कलह लाविला ॥ धेनूते पदप्रहार केला ॥ मार्जारीचा घातहि केला ॥ दुरित असें घडलें ॥२॥ किंचित् काल फलें भोगावी ॥ गाणगभुवनी भेटी घ्यावी ॥ होईल प्राप्त तुज गति बरवी ॥ स्मरता गुरुपद कमलें ॥३॥ तिथुन पातले त्रिंबकक्षेत्रीं ॥ गौतमितट तो प्रथित धरित्री ॥ गौतम मुनिने जीस धरित्री ॥ आणिली निज तपबळें ॥४॥ तटाक यात्रा करित निघाले ॥ मंजरिका क्षेत्रांत पातले ॥ माधवशिष्या दर्शन दिधले ॥ नृसिंह-रूपें भले ॥५॥ पोटशूलाची व्यथा भयंकर ॥ प्राण द्यावया आला विप्रवर ॥ जववुनी पक्वान्ना सुंदर ॥ आरोग्यहि त्या दिलें ॥६॥ सायं देवागृहि करी भिक्षा ॥ देति त्यासि गुरु सेवा दीक्षा ॥ कृष्णाग्रज हा साधुनि लक्षा ॥ चरणरजा वंदिले ॥७॥

### अध्याय १४ वा—आर्या

सायं देव असे कीं यवनगृही नोकरीस त्या ग्रामी ॥ नृप दुष्ट चित्त मारी विप्रांते ठेवुनी निज प्रेमी ॥१॥ धाक मनी विप्राच्या कोण्हा मारील हा कळेना कीं ॥ गुरु वदती जा पुढती व्यर्थ पडू तू नकोस त्या धाकीं ॥२॥ जाता यवनां

पुढती तोच नमे ब्राह्मणाचिये पायी ॥ गौरविला बहु दाने वस्त्र भूषणें अपार नवलाई ॥ ३ ॥ पुनरपि गुरुते भेटे सांगे मग वृत्त जाहले सारे ॥ सेवावे मज वाटे सोडुनिया सर्व संस्कृति पसारे ॥ ४ ॥ श्रीगुरु वदती यावे गाणगभुवनी आम्हासि भेटाया ॥ आम्ही जातो पुढती सांगुनि निघती अशी गुरु छाया ॥ ५ ॥ कलिकालहि ज्या कांपे यवनाचा पाड काय त्या पुढती ॥ अनन्य शरणा तारी ऐकावे चरित जाहले पुढती ॥६॥ वैजनाथि मग येवुनि राहू म्हणती आम्ही इथे गुप्त ॥ जावें तीर्थासी तुम्ही शिष्या आज्ञापिती न व्हा दप्त ॥७॥

अध्याय १४ वा—पद्य ६ वें—फटका

अनंत तीर्थें भूवरि असती नामे वदती गुरुनाथ॥ शिष्यवरहि ते कृतार्थ होती जन्म करिति अपुले सार्थ ॥ धृ ॥ काशी गंगा तटाक यात्रा यमुना संगम दिव्य महा ॥ सरस्वती-करुणावती तैसे देव नदीचे तीर पहा ॥ बहुधा वरुणा शरयु गौतमी नदी चंद्रभागा श्रेष्ठ ॥ कृष्णा वेणा सुजना तारिति संगमस्नाने व्हा तुष्ट॥ पुष्करादि बहु तीर्थें पाहुनि भेटावे मग आम्हासी ॥ बहुधान्य संवत्सरि यावे गाणगभुवनी त्वरितेसी ॥ सिद्धस्थान असे ते आम्ही वास करूं त्या ठायास ॥ येतिल तेथे तरतिल सज्जन स्मरतिल जे प्रभुपायास ॥ नास्तिक होतिल आस्तिक ऐसे गुरुवर तारिति भजकास ॥ अनन्य सेवा सुफल-दायिनी मनी वागवा विश्वास ॥ ऐकुनि तीर्थस्नाना जाती शिष्य राहिले गुरु तेथे ॥ अद्भुत महिमा वर्णन करण्या ऐका पुढती सुकथेते ॥ १ ॥

अध्याय १६ वा—पद्य ७ वें—फटका

कथा साजिरी परिसा गुरुची वैजनाथ सन्निध अंबा ॥ सिद्ध शिष्यसह रहात असतां चहुदिशि पसरे कीर्ति प्रभा ॥ धृ ॥ एक विप्र ये शरण गुरुते म्हणे चित्त मम स्थीर नसे ॥ तप करितो परि व्यर्थ जातसे गुरुकृपा म्हणुनीच नसे ॥ त्यागियलें गुरुने मजलागी शरण आलो या पदकमला ॥ तारि तारि सदया गुरुराया करा धन्य या दासाला ॥ गुरुसेवा मग त्यासी कथिसी धौम्य मुनीच्या इतिहासे ॥ शिष्यत्रय सेविता गुरुच्या कृपेस होती पात्र कसे ॥ तन मन धन अर्पा गुरुचरणी तोच आसरा मानावा ॥ तोचि ब्रह्मा विष्णु सदाशिव मातापिताही जाणावा ॥ उपदेशुनि त्या ज्ञानी केले तोहि लागला गुरुचरणा ॥ अनन्य भक्तां तारक गुरुपद कृष्णाग्रज गाइ कवना ॥१॥

अध्याय १७ वा—पद्य ८ वें

(राग—केदार ताल—त्रिताल)

आले भिल्लवडीला गुरुवर ॥ भुवनेश्वरि संन्निध रम्य स्थल ॥ कृष्णेच्या थडिला ॥धृ॥ कोल्हापुरिचा एक विप्रसुत ॥ मंदबुद्धि आला शरणागत ॥ देवीचरणी जिव्हा अर्पित ॥ दे मज बुद्धिबला ॥१॥ अंबा वदली बाळा ऐक ॥ सिद्ध पुरुष मागे तव सन्मुख ॥ जाइ शरण त्या शमेल तव भुक ॥ मानी मम वचनाला ॥२॥ विश्वासे गुरुचरणि धावला ॥ जिव्हा आली वराहि लाधला ॥ गुरुहि तया मंदास पावला ॥ मान्य जना त्या

केला ॥ ३ ॥ अबुद्ध होई सुबुद्ध सहजची ॥ गुरुकृपेची ऐशी महती ॥ ठेवाया कवनातचि सुरुची ॥ नास्तिकता हकला ॥४॥

अध्याय १८ वा—पद्य ९ वें
(राग—हमीर ताल—त्रिताल)

ऐका अद्भुत लीला गुरुची ॥ नृसिंह वाडिस येती तेथुनी ॥ कृष्णा गंगा संगमस्थानी ॥ अपूर्व महिमा स्नानी दानी ॥ वास तिथे बहु केला ॥ १ ॥ अमरेश्वर चौसष्ट योगिनी ॥ शक्तितीर्थ आणि अपार सुगुणी ॥ ख्याती पसरे चहुदिशि भुवनी ॥ येती जन सेवेला ॥२॥ विप्र दरिद्री होता नांदत ॥ भार्या त्याची पतिसेवनरत ॥ भिक्षा मागुनि जीवन कंठीत ॥ येती गुरु भिक्षेला ॥३॥ वेल घेवडा होता अंगणि ॥ भिक्षा वाढिती शेंगा शिजवुनि ॥ तृप्त जाहले भाजी सेवुनी ॥ जाता उपटिती वेला ॥ ४ ॥ दुःख करिति ते मनि नरनारी ॥ होती गेही अल्पशिदोरी ॥ तीही दैवे नुरली दारी ॥ काढुनि फेकती वेला ॥५॥ गुरूकृपेने नवल जाहले ॥ बहुत द्रव्य खणताचि निघाले ॥ दारिद्र्यचि ते दूर पळाले ॥ प्रभु भक्तिचा भुकेला ॥ ६॥ मग प्रेमे पूजाया येती ॥ ओवाळिति मंगलमय आरती ॥ झाली ऐशी अपार ख्याती ॥ जमला सज्जन मेळा ॥ ७ ॥

अध्याय १९ वा—पद्य १० वें
(राग—सारंग ताल—धुमाळी)

सांगे सिद्धमुनि । शिष्याते । ऐका गुरुचरिताते ॥ ध्रु ॥ योगिनि चौसष्ट । त्या स्पष्ट । गुरुपूजनि नित तुष्ट ॥ औदुंबर महिमा ।

गाय रमा । नृसिंह प्रभुचा गरिमा ॥ प्रेमहि दत्ताचे। या वृक्षी। सेवि तया संरक्षी ॥ गंगानुज एक। पाहि तया ॥ योगिनिसह गुरूसदया ॥ जाता कृष्णेत। दुभंगली । गुप्त मंडळी झाली ॥ नवल म्हणे थोर। अपर दिनी ॥ जाय तया मागुनी ॥ योगिनि-सदनाते। गुरुपूजा । दिसली सुभक्तराजा ॥ गुरु वदती हसुनि। आलासी । सांगे नच कोणासी ॥ येथील वृत्त हे । पुन्हा नये। आशीर्वच लवलाहे ॥ गुरु कृपया प्राप्त । त्या झाले । जीवन धन्यचि केले ॥ एके दिनि बरवी । गोष्ट नवी । त्रिस्थलि यात्रा बरवी ॥ गंगानुज भक्तां । सांगाती । सायं परतुनि येति ॥ प्रयाग काशिगया । मोद तया । गुरुची पाहुनि माया ॥ जावे मनि आले । योगिनिते । कळता प्रार्थिति त्याते ॥ नच जावे इथुनी ॥ वाटतसे । आश्वासिति प्रभु हास्यें ॥ आम्ही गुप्तपणी । राहु इथे । भक्त कार्य करण्याते ॥ अनन्य जो सेवी । आम्हाते। प्रगटू तत्कार्याते ॥ देवुनिया वचना । गुरुमूर्ती । गाणगपुरि मग येती ॥ भक्तांवर छाया । लीला या। रसाळ बहु ऐकाया॥ कृष्णाग्रज प्रार्थी । सुजन जना । गावे गुरुच्या कवना ॥१॥

अध्याय २० वा—पद्य ११ वें.

( चाल—नरजन्मामधि नरा करुनि घे )

आणिक ऐका नवल गुरुचे शिरोळ ग्रामी भला ॥ गुरूचा कृपा-लाभ लाभला ॥ध्रु॥ कर्म विपाके मृतपुत्रा स्त्री शरण गुरुपदी रिघे ॥ समंधहि स्वामि तियेला वदे ॥ दे माझे शत धन मजलागी मीच मारि तव सुता ॥ भिवुनि ती झाली गुरुपदनता ॥ त्रिशूल

त्या दावुनी गुरु वदती देईल ती तेच घे ॥ ना तरी त्रिशूल हा मम बघे ॥चाल॥ ती देईल मुक्ती तुला श्राद्ध मारून ॥ तो तथास्तु म्हणुनी गेला होकारून ॥ गुरु तृष्टविती तिज आशिर्वच देऊन ॥ दोन फळे ओटीत घातली जाय सुखाने गृही- तुझे सुत जगतिल घे भाकही ॥ १ ॥ द्वयपुत्रां प्रसवली पुढे ती गुरुवरदाने भली ॥ उभय सुत जोडी वाढु लागली ॥ मौंज करावी तया सुताची आले मानसी बरे ॥ पाहती मुहूर्त ज्योतिषि त्वरे ॥ आकास्मिक तो धनुर्वात त्या पुत्रा जर्जर करी ॥ कष्टुनी प्राण देत झडकरी ॥ धाय मोकलुनि रडे माऊली समजाविति जन तिला ॥ इथे नच बाई सुचे युक्तिला ॥ ब्रम्हचारी वेषे गुरु आले पाजिति ज्ञानामृत ॥ ती म्हणे झाला कां हा मृत ॥चाल॥ पारिपूर्ण फळें गुरुकृपामृते लाधली ॥ ती अपूर्ण कैसी दुर्दैवे जाहली ॥ मांडाया गुरुपदि निघे ससुत माउली ॥ शिर आपटि पादुकावरी रुधिरें अभिषेकी तया ॥ येऊद्या म्हणे गुरुवरा दया ॥२॥ रात्री समयी चतुर्थ प्रहरी स्वप्नी प्रगटुनि हरी ॥ म्हणे कां रुसलिस आम्हावरी ॥ कुचुनि सुताचा प्राण तुझ्या या गेला परतुनि आता ॥ आणि तो सोडि दुःख सर्वथा ॥ हा आला बघ प्राण सुताचा सांभाळी भामिनी ॥ जागृत हो विप्र कामिनी ॥चाल॥ तो सुत बोले गे माते ये लवकरी ॥ धरियले हृदयि त्या बाळा नवलांकरी ॥ स्वामिची सत्य जाहली गुरु वैखरी ॥ शुद्धजले न्हाणिती पादुका पूजनि मन रंगले ॥ गुरुकृपे सर्व दुःख भंगले ॥ ३ ॥

अध्याय २१ वा—पद्य १२ वें
( राग—पटदीप ताल—झपताल )

दत्तगुरु दत्तगुरु गाय नित मानवा ॥ होशि जगि धन्य तूं सहज चुकविशि भवा ॥धृ॥ नवल तरले किती स्मरागि गुरु ज्या बरे ॥ भक्त वरदानि हा दावि बहु लाघवा ॥१॥ दास कृष्णाग्रज करि धरुनि पदनता ॥ कवन निज करवुनी मार्ग दावित नवा ॥२॥

॥ द्वितीय दिन वाचन समाप्त ॥

## दिवस तिसरा

अध्याय २२ वा—पद्य १ लें
( चाल—नृप ममता रामावरती )

गुरु गाणगभुवनी आले ॥ संगमी प्रथम राहियले ॥ सुस्थळी ॥ भीमाऽमरजा बहु रम्य ॥ स्थान श्रेष्ठ ते सुखगम्य ॥ त्या स्थळीं ॥ भिक्षेसि येति ग्रामात ॥ मागुती परतुनी जात ॥ त्या स्थळीं ॥चाल॥ त्या स्थळी, जाहले चरित । येति गुण भरित, मध्य दिनी त्वरित ॥ मागण्या भिक्षा ॥ विप्रगृहि एका दक्षा, सुजनशा ॥ १ ॥ पति भीक्षेस्तव गेलेसे ॥ पतिव्रता गृही उल्हासे, धाव घे ॥ स्वागत करी आसनी बसवी ॥ पक्वान्न येतिल बरवी, झोळित ॥ गुरु वदे दूध मज पाज ॥ का होशि व्यर्थ नाराज भामिनी ॥चाल॥ तव गृही असूनी म्हैस ॥ उगा कां त्रास ॥ वाट बघण्याचा ॥ ती वदली नम्र सुवाचा ॥ कामिनी ॥ २ ॥ गुरुवरा वांझही म्हैस ॥ वाहतो पाणि पाठीस ॥ घालुनी गुरुवदती असत्य वदशी ॥ जा आणि दुहोनी महिषी ॥ मग वधूठेवुनी वचनि विश्वास ॥ पाहता दिसे भरकांस ॥ पयभरे ॥

॥चाल॥ दोहिले ॥ अमृतमय दुग्ध ॥ तापवुनि शुद्ध ॥ पाजिले गुरुला ॥ पाजिले गुरुला ॥ आशीर्वच लाभे महिला ॥ हो सुखी॥३॥

अध्याय २३ वा—पद्य २ रें

(चाल—नृप ममता)

ऐकुनि नवल जन करिती ॥ श्री गुरुची ऐशी महती ॥ ाढली ॥ लोकही दर्शना येती ॥ वरदाने तुष्टचि होती ॥ निजमनी ॥ रायास कळे जै मात ॥ धावत तो गेला तेथ ॥ स्वागती ॥ ॥चाल॥ शिबिकेंत बसवी गुरुनाथ ॥ वाद्य दे साथ ॥ आणि गांवात ॥ दर्शनासाठीं ॥ जनतेची झाली दाटी ॥ एकची ॥१॥ अश्वथ पुरातन फार ॥ समंध तयावरी थोर ॥ वसतसे ॥ धावुनी गुरुच्या चरणी ॥ शरणांगत आला धरणी ॥ नवल हे ॥ उद्धार तयाचा केला ॥ होता तो कृपा भुकेला ॥ जाणुनी ॥ ॥चाल॥ करि वास ॥ तया ठायास ॥ पुढें मठ खास ॥ उभविला राये ॥ उद्धरिले किति गुरुराये ॥ आजवरी ॥२॥

अध्याय २४ वा—पद्य ३ रें—आर्या

गाणग ग्रामाजवळी कुमसी ग्रामी त्रिविक्रमाभिधेत ॥ राहति यतिवर मोठे निंदिति गुरुला वदोनि दांभिकते ॥ १ ॥ जाणुनि तन्मन गुरुवर जाती भेटावया तयालागी ॥ चतुरंग सिद्ध सेना नृपसह चाले गुरु पुरोभागी ॥ २ ॥ पाहे तो सन्यासी मानस पूजा करी मनी ज्याची ॥ ती देवताच पुढती यतिरूपें उतरली गमे साची ॥ ३ ॥ भ्रांत मनी क्षण झाला नर न खरा हाचि देव स्पष्ट दिसे ॥ साष्टांग नमी पायी तारी गुरुराज नम्र दास

असे ॥४॥ गुरु वदती कां निंदिसि दांभिक म्हणुनी वृथा अता बोल ॥ लोळे पदकमलावरि चुकलो करणे क्षमा उतावेळ ॥५॥ विश्वरूप दर्शन त्या अर्जुन सम दाविले असा माझा ॥ प्रभु हा समर्थ जगती यापुढती करू नये कुणी गमजा ॥६॥ परतुनि-गाणगग्रामी आले गुरु राहिले मठामाजी ॥ सेवा करिती जन बहु सद्भक्तां हा सदा असे राजी ॥७॥

अध्याय २५ वा—पद्य ४ थें

(चाल—चंद्रकांत राजाची कन्या)

बेदर ग्रामी यवन भूप तो ब्रह्मद्वेष करि मनी सदा॥ वरवर दावी प्रेम श्रवण करी विप्राकडुनी चहुवेदां ॥धृ॥ शास्त्रें म्हणवी वादहि करवी विदुष येति बहु सभांतरी ॥ ऐकविती त्या नृपा तोहि दे अमित धनाते परोपरी ॥ ऐकुनि शास्त्रं निंदा करि मग यज्ञयाग करिती हिंदु ॥ नांवे ठेविति यवनालागी स्वयें मद्यपी स्वच्छंदू ॥ ऐशापरि चाले बहु निंदा दोन विप्र अवचित आले॥ विद्वत्ता दावण्यां आपुली जयपत्रें दाविती भले ॥ राव म्हणे जा राष्ट्री माझ्या फिरा विप्र हरवा सारे ॥ मीही देइन धन बहु तुम्हा विप्रराज मानीन खरे ॥ कुमसी ग्रामी त्रिविक्रमाते लोक वदति तुम्ही हरवावे ॥ दोघे आले यतिसामोरी म्हणती वाद करू यावे ॥ मुनी बोले विद्वद्वर तुम्ही मानपान आम्हासि नसे ॥ ते न ऐकती म्हणुनि आणिती गाणगि गुरूच्या सन्मुखसे ॥ पायि चालवुनि यतिरायाते शिबिकेमधि येती विप्र ॥ मदांध यति अपमाने त्यांचा

आयुःक्षय झाला क्षिप्र ॥ समोर येउनि उद्धत भाषणी गुरुसी म्हणती वाद करा ॥ हारी पत्र द्या अथवा आम्हा उपाय एकचि असे खरा ॥ गुरु बोधिति मग ज्ञान तयाप्रति अनंत वेद असती जाणा ॥ भारद्वाज मुनींचे सांगति उदाहरण त्या मूढ जना ॥ चहुवेदांची उत्पत्तिस्थिति व्यापकत्व त्यांचे वदती ॥ ऐकुनिही ते मूढ विप्रब्रव मागति जयपत्रचि पुढती ॥ आली दुर्गति ज्यांची जवळी त्यासाचि ऐसी बुद्धि सुचे ॥ वाद पुढिल अध्यायी घडला कृष्णाग्रज वानी सुवचे ॥ १ ॥

अध्याय २६ वा—पद्य ५ वें

(चाल—अहो ही माया)

चहूं वेदांची, सांगुनि उत्पत्ति ॥ तयाचा छंद ऋषी कथिती ॥ प्रथम ऋग्वेद, यजुर्वेद दुसरा । सांगती सामवेद तिसरा ॥ वेद तो चवथा । अथर्व त्या नाम ॥ पठणें भक्ता विश्राम ॥ मोक्ष सुख देती,वेदत्रयि महिमा । वर्णिला गुरुने तद्गरिमा ॥ वेद तो चवथा । मंत्र शास्त्र थोर, साधका वैभव दे फार ॥ कोण संपूर्ण, शिकेल हे वेद ॥ वदलो अल्पचि हे भेद ॥ सुखे परतावे, त्यजा अहंकार ॥ करावे साधन सुविचार ॥ १ ॥

अध्याय २७ वा—पद्य ६ वें

( राग—बागेश्री ताल—त्रिताल )

ऐकतिना गुरुवचना ॥ द्विज ते ॥ समाजाविति बहु परी पटेना ॥ युक्ति करी यतिराणा ॥ धृ ॥ ग्रामस्था पाचारिति गुरुवर । पखालवाहक अंत्यज पामर ॥ धावुनि लागे चरणी भूवर ॥ आज्ञा वदा सुजाणा ॥१॥ रेपा काढिति सात समोरी गुरु वदती

चालुनि ये त्यावरि॥येता ज्ञानी क्षणाभीतरी ॥ झाला करी मग नमन ॥ २ ॥ प्रथम असे मातंग कुळीचा ॥ रेषा ओलांडिल्या सुवाचा ॥सप्तम रेषे ब्राह्मण साचा ॥ वेद शास्त्र ये अपणा ॥३॥ विभूति प्रोक्षिति तदंगि गुरुवर ॥ आज्ञापिती वाद करी सत्वर । पाहुनि झाले विप्र भयातुर ॥ करिती गुरुच्या कवना ॥ ४ ॥ शापिति गुरुवर त्या विप्रांसी ॥ छळिलें त्रिविक्रम यतीश्वरासी ॥ पिशाच्च व्हावें बारा वर्षी ॥ होईल मग उद्धरणा ॥५॥ अद्भुत ऐशी रसाळलीला ॥ सुजना सुखवी भीतिद काला ॥ कृष्णाग्रज कवि गाय विशाला ॥ पदि अर्पुनि मन सुमना ॥ ६ ॥

अध्याय २८ वा—पद्य ७ वें.

( राग—यमन ताल—त्रिताल )

कर्मविपाक तयां । गुरु वदती । चांडालाचे जन्म तुझे बा । केवि देऊ अभया ॥धृ॥ मागिल जन्मी जशी कृती तव ॥ गती प्राप्त हो तशीच यास्तव ॥ शुद्धाचरणी रत जो मानव ॥ त्यावरी देव दया ॥ १ ॥ निजधर्माचे करी आचरण ॥ निंद्य न सेवी आचरी सद्गुण॥ कर्म न सोडी वंद्य पुरातन ॥ पावे तो विजया ॥२॥ अनंत पापें जन आचरिती ॥ निजसौख्याते अपुल्या मुकती ॥ स्वये आचरुनि इतरां वदती ॥ सोडा नीति नया ॥३॥ अन्नान्न दशा होउनि मरती ॥अधोगती मग स्वये पावती ॥ ईशकृपेला विन्मुख होती सोडुनि देव भयां ॥४॥ वदती गुरु मातंग आज तूं॥ मनी आणिना लवही किंतू ॥ सन्मार्गे पुढती तव हेतू ॥ पुरतिल सोडि भयां ॥५॥

### अध्याय २८ वा—पद्य ८ वें
(चाल—शारदा माते)

कर्मगति गहना । जाणरे ॥ कृती करावी तसे भरावे ॥ ठेवी सद्भावरे ॥ धृ ॥ सुचरित्रें जन सौख्य पावती ॥ कुचरित्रें दुःखाची प्राप्ती ॥ मरणांती पावेल दुर्गती ॥ न कुठे त्या मानरे ॥१॥ आज जसे तूं आचारशील ॥ फलहि तसे तूं पुढे पावशिल ॥ दुर्गतिचा अधिकारी होशिल ॥ मम वचना मानरे ॥ कर्मगति ॥

### अध्याय २९ वा—पद्य ९ वें
(चाल— एकदां दृष्टि भरूनि पाही)

श्रीगुरु उपदेशिति ज्ञान ॥ पतिता करिती सज्ञान ॥धृ॥ तुझा हा जन्म पतित याति ॥ चालवी आज त्याच रीती ॥ स्त्रियासुत तुझिया संसारी ॥ त्याशी न सोडी जाय घरीं ॥ परी त्या न रुचें ते वचन ॥ म्हणे मी ब्राह्मण शुद्ध मन ॥ विचारिति गुरु मानसि तेव्हां ॥ विभूती पुसता जाइल हा ॥ सांगती शिष्या प्रभुराव ॥ स्नानें जाइल हा भाव ॥ घालिता स्नान त्वरे त्यासी ॥ विभूती पुसली ती खाशी ॥ पुन्हा अज्ञान प्रगट झाले ॥ घराचे स्मरण तया आले ॥ स्त्री सुतासंगे गृही गेला ॥ भस्म महिमा अभिनव कथिला ॥ वामदेवाच्या इतिहासे ॥ दुर्जय यवनकथा परिसे ॥ पंचविस जन्म राजयाचे ॥ वदले शिष्या गुरु साचे ॥ राक्षसहि वामदेव स्पर्शे ॥ कसा उद्धरिला तो हर्षे ॥ कैलासी शिव हा महिमा ॥ कथिती देवाते गरिमा ॥ ऐकुनि तुष्ट शिष्यराव ॥ गुरुच्या पदी ठेवि भाव ॥ कृष्णाग्रज हा गाय गुणा ॥ गुरुच्या अद्भुत रम्य खुणा ॥ १ ॥

अध्याय २९ वा—पद्य १० वें

( राग—भीमपलास ताल—झपताल)

त्वरित धरी गुरुपदा, जाति सकलाऽपदा ॥ धृ ॥ विमल यश गात जा ॥ मारि ऽहंकृति गजा ॥ भव भया पारजा ॥ मिळवि बहु संपदा ॥१॥ नित्य स्मरतां हरी ॥ सहज दुरिता हरी ॥ कीर्तियाची खरी ॥ गाति सज्जन सदा ॥ २ ॥ गाय गुरुच्या गुणा ॥ वागवुनि सद्गुणा ॥ तोचि जाणिल खुणा ॥ घाव घाली मदा ॥ ३ ॥

॥ तिसरा दिवस वाचन समाप्त ॥

# दिवस चवथा

अध्याय ३० वा—पद्य १ लें

( फटका )

माहुर क्षेत्री गोपिनाथ द्विज संतति नव्हती तया घरी ॥ सेवा करिता दत्तप्रसादे पुत्र जाहला तुष्ट हरी ॥ धृ ॥ दत्त नाम त्या पुत्रा ठेविति सुत वाढे दिनदिनी तदा ॥ पति-पत्नी आनंदित उभयहि कौतुक पुत्राचेच सदा ॥ पंचवर्षि व्रत-बंध योग्य सुत थाटानें करिती मौंज ॥ सुत रत्नाच्या अपूर्व लाभे स्वर्गहि झाला त्या खंज ॥ द्वादश वर्षे कुमरा झाली विवाह केला सुमनाने ॥ स्नुषा पातली गृहात आता काय उरे-सौख्यता उणे ॥ सर्व सखाला भरती येता देवाचा तै विसर पडे ॥ रीत हीच जगतात दिसतसे इथेच परि सत्सौख्य अडे ॥ ज्याने दिधले तया विसरतां कां न तया ये संताप ॥ नवल काय आपत्तीरूपें भोगावा लागे ताप ॥ जुन्या नव्याचा भेद प्रभूच्या दरबारी

अगदीच नसे ॥ फटके बहु हे तीक्ष्ण हरीचे भोगावे लागती कसे ॥ अनुभवुनीही न हो शहाणा-बुद्धिमान म्हणवी मोठा ॥ कां न तयाच्या शिरी हाणावा प्रभुने अपुला भय सोटा ॥ तसेच झाले इथे विप्रसुत षोडश वर्षी वय होता ॥ अकस्मात ज्वर त्यासि पातला वाढे दिनादिनि थोर व्यथा ॥ शरीर रोग ग्रस्त जहाले नाना व्याधी सोबतिला ॥ क्षयरोगाने ठाणे दिधले वैद्यौषधिगुण न दे भला ॥ स्नुषा पतिव्रत चालवि कष्ट सेवी पतीच्या चरणाला ॥ देव सतीचा पतीच ऐसा, अपाय होवो नच त्याला ॥ वर्ष त्रय जाहले त्राण शरिरात नुरे त्याच्या कांहीं ॥ वैद्यहि म्हणती पुरे औषधें अनुष्ठान करावा काहीं ॥मृत्युंजय जप थोर मांडिला अपार दाने विप्रांस॥देतांही गुण नयेच काही नुरली लवही मनि आस ॥ पुत्र वदे मग मातापित्याते ऋणानुबंधाचि सर-लासे ॥ वृद्धपणी सेवावे तुम्हा मनात होते दैवि नसे ॥ जाणारा नच फिरे मागुता क्षमा करा निजबाळाला ॥ एकोनी आक्रोशा करिती मारिति हात कपाळाला ॥ रुसला कां प्रभुदत्ता आम्हावरी काय चुकलो सेवा ॥ तूच दिला आणि परतहि नेशी वृद्धपणीचा सुत ठेवा ॥ पत्निस बोले सुत तो कांते मातृगृही वा येथ रहा॥ संचित पूर्वजन्मिचे काही भोगुनि साही दुःख महा॥ ती वदली मी संगति तुमच्या येइन मागे नच राही ॥ हीच प्रतिज्ञा साक्ष पदाची पतिला सति देई ग्वाही॥ अकस्मात् बैरागी वदला ने याते गाणग भुवना ॥ होइल या आरोग्य त्वरित कीं विश्वासे करिगे गमना ॥ सासू श्वशुरां विचारुनि सती डोलित

निजवी निजपतिला ॥ दासदासि संगती घेउनी निघे त्वरित तीं गुणशीला ॥ त्रिदोष वाढे प्रवासि रोग्या मठाजवळि उतरी डोली ॥ जाऊ दर्शना गुरुच्या म्हणुनी पाहे सति धावुनि आली ॥ गतप्राण पाहता तयाला कोसळली जणु वीज शिरी ॥ मूर्छित पडली अपार रडली शांतविती किति नर नारी ॥ ब्रह्मचारी वेषे गुरु आले उपदेशिति कां रडतीस ॥ कोण कुणाचा जगी बाळ या वृथा खेद कां करतीस ॥ पाण्यावरचा जसा बुडबुडा जीव तसा हा जगी बये ॥ क्षणभंगुर संसाराचि सारा नश्वरि माया करु नये ॥ कर्माधीन असे जग सारे भोगावे लागेच जना ॥ ऋणानुबंधे संगति-लाभे जाणति ज्ञाते ईशखुणा ॥ माथा ठेवी तत्पद कमली दावा मजला मार्ग बरा ॥ न सुचे मज गुरुवरा समयि या बोध करावा योग्य खरा ॥१॥

अध्याय ३१ वा—पद्य २ रें

(चाल—अजि अक्रुर हा)

मग योगिवरे उपदेशिलि ती बाला ॥ स्त्री धर्म कथिति तिज विमला ॥धृ॥ लोपामुद्रा अगस्तिची प्रिय भार्या ॥ त्रिजगात प्रथित बहु आर्या ॥ सति निजधर्मे राहिल जरि जगतात ॥ तारिल ती अपुला कांत ॥ चाल ॥ सति अरुंधती सावित्री ॥ अनुसया माय धरित्री ॥ मेनका सुनीति पवित्री ॥ किती धन्य अशा साध्वी भूतलि झाल्या ॥ सौभाग्यसौख्य रस प्याल्या ॥१॥ प्रारब्धवशे अंतरता पतिपाय ॥ हरि सेवनि झिजवा काय ॥ विधवाधर्मे वागावे नियमाने॥पावे सद्गति सन्माने ॥ सहगमन जरी घडले नाही सतिला ॥ सतिधर्म तियेसी कथिला

॥चाल॥ पति माना श्रीहरि लागी ॥ सतत ध्यान ठसवा अंगी ॥ जगि राहुनि व्हा निस्संगी ॥ पावन होती विधवा या धर्माने ॥ हा पथ पतिसह स्वर्गाने ॥२॥

अध्याय ३२ वा—पद्य ३ रें.

( चाल—असा धरि छंद )

शुद्धाचरणी ॥ सति पुण्यलाभ सहगमनी ॥धृ॥ दूर जाहलां मृत जरि कांत ॥ गमन वर्ज तिज अथवा सुसुत ॥ लहान असतां न करी अंत॥ शास्त्र वच सरणी ॥१॥ उटणे परिमल नच सेवावे॥ उंच आसनी नच बैसावे ॥ अधःशयन एकान्नचि खावे ॥ पतिपद ध्यानी ॥२॥ आवड आपणा ज्या वस्तूंची ॥ दानी द्यावी विप्रासांची ॥ स्नान तीर्थ यात्रा धर्माची ॥ आवड स्वमनी ॥३॥ दीपदान गृहदान करावे ॥ पुत्रमताने नित वागावे ॥ विधवाधर्मे ऐशा पावे ॥ पतिच्या चरणी ॥४॥ शास्त्रपुराणी हा आचार ॥ करिता पावे सद्गतिथोर ॥ श्रीहरि तोषे सौख्य अपार ॥ चुकवि भव भ्रमणी ॥५॥

अध्याय ३२ वा—पद्य ४ थें

(चाल—अहो ही माया)

वदे तिजलागी । तिजलागि योगिराज ॥ होशि कां व्यर्थचि नाराज ॥ ब्रह्मलिखित हे ॥ लिखित हे चुके कुणा, शिणविला हरिश्चंद्र राणा ॥ बलीसम दानी,दानी पाताली । कुरव रावणास काल गिळी ॥ भीष्म, द्रोणही रणी पडले । परिक्षितिसाठीं जन रडले । काल बलवान ॥ बलवान त्रिभुवनात ॥ चुके जरि द्रवतिल गुरुनाथ ॥ शरण तूं जाई ॥ जाई संगमागे प्रार्थुनी वर

प्रदान मागे ॥ चरणतीर्थ ते ॥ तीर्थ ते आणि बाळे ॥ शिंपुनी सति वेल्हाळे ॥१॥

अध्याय ३२ वा—पद्य ५ वें

( चाल—केशवकरणी अघटित लीला )

सती जावया सती निघाली वाणें किती दीधली ॥ स्वये ही सालंकृत जाहली ॥ धृ ॥ सुंदर कुंकू मळवट भरिला हळद लाविली करि ॥ घालुनि चुडा हरित सुंदरी ॥ पतिप्रेतासह मिरवित चाले कौतुक लोक गमे ॥ जनसमुह सतिपदकमला नमे ॥चाल॥ मग बांधि कर्णि रुद्राक्ष पतीच्या करे ॥ आणि स्वये कर्णि बांधिले दोन साजिरे ॥ निजवीत चितेवरी पतिला अपुल्या करे ॥ हर्षखेदयुत जनता पाहे अद्भुत करणी तिची ॥ कथा ही तारका या साध्विची ॥ १ ॥ स्मरण जाहले जावे दर्शन करण्या गुरुच्या पदी ॥ सज्जना तारक जे आपदी ॥ लोकां विनवी जाउनि येते तोवरि द्या लक्ष कीं ॥ देह हा न हो श्वान भक्ष्य कीं ॥ जाय संगमी जनाहि धावले गुरुपदकमली पडे ॥ गुरुकृपा पात्रिच की सापडे ॥चाल॥ मुनि वदती सुत सौभाग्यवती हो जगी ॥ आश्चर्य गमे परतोनी घरी पद उगी ॥ आशिर्वच गुरुचे होईल कां वावुगी ॥ आणविला पती तिचा तिथें मग प्राशवि चरणामृत ॥ गुरुने जिवंत केला मृत ॥२॥ शंकित लोकां प्रभु ते वदले उसने आयुष यया ॥ पुढिल घेतले करुनिया दया ॥ तीस वर्षे हा जगेल भूवरि होतिल सुत कन्यका ॥ पावली वर साध्वी कन्यका ॥ अशक्य भूतलि काय हरिला कोण दयाळू असा ॥ गुरुपुढें म्हणुनिच पसरा पसा ॥

॥चाल॥ देणार एक गुरुदत्त जशी वासना॥ निष्ठेनें जन हो कराच औपासना ॥ पावेल कसा हा यन्मनि विश्वासना ॥ कृष्णाग्रज डांगोरा पिटुनी हाकारी त्या जना॥ आठवा सोडुनि दुर्वासना ॥३॥

अध्याय ३३ वा—पद्य ६ वें

( चाल—फटका )

रुद्राक्षाचे महत्त्व सांगति समजाऊनि गुरु सतिलागी ॥ कंठि शिरी रुद्राक्ष बांधिता खचित होय मुक्तीभागी ॥ धृ ॥ काश्मिर देशी भद्रसेन नृप प्रधान तैसा सूज्ञ जया ॥ एक एक सत्पुत्र उभयतां होता प्रारब्धे उभया ॥ सुधर्म तारक नामे त्यांची गाती शिवगुण स्वच्छंदे ॥ अलंकार भूषणें त्यागुनी रुद्राक्षा धारिती मोदे ॥ राव म्हणे हे अशे चिन्ह कां ? राज-भोग या कां न रुचे॥ आले गुरु ते पराशर मुनी राव पुसे त्या नम्र वचे ॥ आसनि पूजुनी कुमार करणी सांगे हे वागति कैसे ॥ त्रिकालज्ञ मुनि विचार करूनी पूर्व जन्म कथिती जैसे ॥ होती एक महानंदा सति वेश्या जातीत नवल पहा ॥ तिने पाळिले कुक्कुट मर्कट तेच जाहले पुत्र पहा ॥ रुद्राक्षे भूषवी तयासी भस्मलेपने त्या सजवी ॥ तीच सवय उभयाते जडली या जन्मी चित्ता रिझवी ॥ सत्व पहाया शंकर आले सौदागर-वेषा धरूनी ॥ सिद्ध तया सेवा या वेश्या लिंगाद्भुत करि पाहोनी ॥ द्या मज इतुके होइन तुमची सती तीन दिवसापुरती ॥ तथास्तु बोले सौदागर मग जतन करी गे या परती ॥ दग्ध जाहले तरि मी देइन प्राण असे कीं पण माझा ॥ लिंग ठेविले

नृत्यागारी क्रीडा करि त्या सममाजा ॥ कुक्कुट मर्कट नर्तन सदनी अग्नि लागला थोर तया ॥ दग्ध जाहले उभयहि तेथें आत्मलिंग गेले विलया ॥ सौदागर तो वदे लिंग दे धावे पाहे हाय वदे ॥ लिंग जाहले दग्ध क्रुद्ध तो सौदागर मग तीस वदे ॥ देतो मी बघ प्राण आपुला उडी घालि अग्नीमाजी ॥ सती जावया तीहि निघाली मात पिता नसता राजी ॥ प्रगट शंभु तिज हृदयी धरिले उडी टाकता आगीत ॥ उद्धरली नगरासह नारी सिद्ध संत गाती गात ॥ पूर्व जन्मिच्या अभ्यास हे धारण करिती रुद्राक्ष ॥ या योगे होतील खचित हे श्रीशिवशंभु कृपापात्र ॥१॥

### अध्याय ३४ वा—पद्य ७ वें
### ( राग—भैरवी ताल—त्रिताल )

राव पुसे मज सांगा । गुरुजी । किती आयू भोगिती भवांतरि॥ राहति संसृति संगा ॥धृ॥ पराशर वदे ऐक नृपाळा ॥ बारा वर्षे आयु कपाळा ॥ उरले सात दिवस या भाळां ॥ जातिल सोडुनि अंगा ॥१॥ ऐकताच नृप मूर्च्छित पडला॥ गुरु सावरिती त्या भूपतिला ॥ खेद नसो तुज उपाय सुचला ॥ ऐक होय भव - भंगा ॥२॥ रुद्रानुष्ठाने शिवसेवा ॥ देइल याला खास अभेवा ॥ सिद्ध ब्राह्मणाकरवी देवा ॥ सेवुनि लभ्य शुभांगा ॥३॥ मग मांडिती तप शत विप्रांकरि ॥ अवधी झाला सात दिनावरी ॥ अकस्मात मूर्च्छागत भूवरि ॥ आल्या दुःख प्रसंगा ॥४॥ तीर्थं शिंपिती धावुनी मुनिवर ॥ सावध केला क्षणी नृप कुमार ॥ पुसता सांगे कथा मनोहर ॥ कालपुरुषकृत दंगा ॥५॥ शिव-

दूते परतोनि आणिले ।। काला मारित मारित नेले ।। नारदही त्या समयि पातले ।। वदती शिव अनुरागा ।।६।। दशसहस्त्र वर्षे वय बाळा ।। रुद्रजपे वाढले नृपाळा ।। आनंदित नृप करी सोहळा ।। धन गृह बोले मागा ।।७।। ऐसी कथा विचित्र गुरु ते कथिते झाले साध्वी स्त्रीते ।। कृष्णाग्रज हा यथामती ते ।। पी अघनाशिनि गंगा ।।८।।

अध्याय ३५ वा—पद्य ८ वें
(चाल—अजि अक्रुर हा)

सति प्रार्थि पुन्हा गुरुला व्रत मज सांगा ।। द्या अथवा मंत्र शुभांगा ।।धृ।। गुरु वदले की मंत्र स्त्रियास कशाला ।। दे पति सेवा सुयशाला ।। कच शुक्रवचा कथानकासी वदले।। मंत्रसत्व वाया गेले ।।चाल।। स्त्रीला पतिसेवा मंत्र ।। तारक हे त्रिजगी तंत्र ।। द्यावा नच मंत्र स्वतंत्र ।। ऐसे वदता पटले सति चित्ताला ।। पतिसेवनि निश्चय केला ।।१।। व्रत काय करू म्हणता शिवव्रत सांगे ।। सीमंतिनि कथा प्रसंगे ।। चित्रागंद तो नदीत जरी बुडाला ।। साध्वी ती त्यजि न व्रताला ।। त्रय वर्षाने प्रगट शिवकृप झाला ।। व्रतप्रभाव सातचा फळला ।।चाल।। चिरशांति सुखा स्वानंदे ।। पावले उभय बहु मोदे ।। पतिव्रता नाव जगि नांदे ।। बाळे करि गे व्रत परिपालन ऐसे ।। गुण गातिल जन आपैसे ।।२।। आशिर्वादे गुरुच्या पति आरोग्य ।। जाहले प्राप्त सौभाग्य ।। आज्ञा घेती परतुनिया या सदनी ।। पातले गृही गुरुपुजुनी ।। माता पितरा भेटी सुत तो नमला ।। हा सती प्रभावचि गमला ।।चाल।। सुत माझा परतुनि आला ।। आशा

मम केली सफला ।। जन्माचि हा धन्य जाहला ।। गुरुकृपया हो पुरति वासना ऐशा ।। कृष्णाग्रज कथि संदेशा ।।३।।

### अध्याय ३५ वा—पद्य ९ वें.

( चाल—शारदामाते तुज नमो')

गुरुकृपा फलदां, पावनी ।। भजा भजा हो सज्जन सारे ।। स्मरता सुखदायिनी ।।धृ।। सर्व सुखाचे साधन ऐसे ।। कलियुगि सोपे सहज साध्यसे ।। लीला सुंदर धरुनि भरवसे ।। गा गुरुला गायनी ।।१।। सकलेच्छा पूरक गुरु माझा ।। अनुभव घ्या पुरवुनि घ्या गरजा ।। शांति सुखा देइन सुप्रजा ।। धन गृह वैभवखनी ।।२।। कृष्णाग्रज हा नम्र लेकरूं ।। याचितसे पसरोनी पदरूं ।। सज्जन हो या नका अव्हेरूं ।। इहपर सुख साधनी ।।३।।

।। चतुर्थ दिन वाचन समाप्त ।।

## दिवस पांचवा

### अध्याय ३६ वा—पद्य १ लें

(चाल— येई धावत मम बाळा)

गाणगापुरि गुरु असताना ।। दर्शना येती जन नाना ।। धृ ।। नवसहि करिती गुरुचरणी ।। सफल हो इच्छा तत्स्मरणी ।। चहुदिशी कीर्ति प्रथित झाली ।। कस्तुरी राहिल कां लपली ।। परिमळे वासित करि देशा ।। राहती सोडुनि निजदेशा ।। समाराधना अमित होती ।। उठती पंक्तीवर पंक्ती ।। ऐशातची भक्त एक ।। पूजना आला बहु धनिक ।। जाहलें नवल तेच परिसा ।। गुरुच्या सेवा गानरसा ।। गाणगग्रामी पितृश्राद्ध ।।

गुरुकृपे होइल की सिद्ध ॥ सद्गति मिळेल पितराना ॥ जेववु बहुत ब्राह्मणाना ॥ दांपत्ये बहु घालावी ॥ लक्ष्मी सुकर्मि योजावी॥ पितृगण होतील संतुष्ट ॥ मनाचे जातिल मम कष्ट ॥ शुभेच्छा अशी तया चित्ती ॥ गुरुचरणी बहु त्या प्रीती ॥ दांपत्ये बहु सांगितली ॥ जेववी धन दे सुख शाली ॥ रोज हा चाले क्रम बरवा ॥ नित्य पक्वान्ना स्वाद नवा ॥ अशाताचि झाले की चरित ॥ ऐका कथा स्थिर चित्त ॥ १ ॥

### अध्याय ३६ वा—पद्य २ रें

(चाल—चद्रकांत राजाची कन्या.)

गाणग ग्रामी एक विप्र तो परान्न प्रतिग्रह कधी न घे ॥ पत्नी त्याची गृही कर्कशा भोजनि तुष्ट द्विजांसि बघे ॥ ध्रु॥ वदे पतीला आपण जाऊ मिष्टभोजना मनि वाटे ॥ नित्य कदान्ना खाउनि मन हे माझे नाथा खचित विटे ॥ विप्र म्हणे गे दोष परान्नी मी न जाइ भोजना कुठे ॥ खिन्न पत्नि गुरुचरणी धावे म्हणे कदान्न कधी न सुटे ॥ आपणा सांगा मम पतिराया मिळेल मजला पक्वान्न ॥ दंपति पूजनि तुष्ट होय तो हट्ट धरी की यजमान ॥ बोलावुनि गुरु तिच्या पतीला परान्न घ्याया दे आज्ञा ॥ तथास्तु म्हणुनी भोजनि बसला मानुनि गुरुचरणा आज्ञा ॥ साध्वी पाहे जेवती संगे श्वान शूकरहि पानात ॥ विटले मन तै उठली झडकरि जेविति कैसे हे भ्रांत ॥ पती म्हणे वासना पुरलिना परान्न खाउनि हो तुष्ट ॥ पाय धरूनि ती वदली साध्वी नका होऊ मजवरि रुष्ट ॥ पुन्हा न जाइन परान्न घ्याया

कदा न सेविन तुम्हासवें ॥ गुरु वदती झालीस तुष्टना त्रास पतीला देऊ नये ॥ विप्र पुसे आचार करावा कसा वदा मज गुरु स्वामी ॥ पुढील पद्यी लिहीन थोडा कृष्णाग्रज गुरु पाय नमी ॥ १ ॥

अध्याय ३६ वा—पद्य ३ रे

( राग—कानडा ताल—त्रिताल )

कथिति गुरु आचार ॥ ब्राह्मणा । अडला जरि कुणि ब्राह्मण न मिळे ॥ जा तेथें साचार ॥धृ॥ दांभिक क्रोधी कृपण स्त्रीजित ॥ लोभी तस्कर पर द्रव्यारत ॥ निंदक खलहि अधार्मिक संतत ॥ भोजनि दोष अपार ॥ १ ॥ ब्राह्मणधर्में स्वयें वर्तती ॥ इतरासहि तैसे शिकवीती ॥ गुरु-बंधू स्वजनादि संगती ॥ भोजनी दोष न फार ॥ २ ॥ प्रातःकालापासुनि सगळे ॥ आन्हिक शास्त्री असे आगळे ॥ वदले रात्रीवरी चांगले ॥ सुखदायकचि विचार ॥ ३ ॥ निजधर्में पावेल यशाला ॥ पर-धर्में पावे नाशाला ॥ पदोपदी हा अनुभव सकला ॥ शोधा यातुनि सार ॥ ४ ॥ संध्या त्रैवर्णिकास कथिली ॥ मुख्य देवता हीच माउली ॥ तिजसी त्यजोनी जनता वाहिली ॥ दुःखी बनली फार ॥५॥ गायत्रीही पूज्य त्रिवर्णा ॥ देइल सुख धन धान्य सुवर्णा ॥ सुजनाकानी वाजवी कर्णा ॥ कृष्णाग्रज साचार ॥६॥

अध्याय ३७—पद्य ४ थें

( राग—बिहाग ताल—त्रिताल )

आचरणी धरि काम ॥ विप्रा । शुद्धाचारें पूज्य जाहले ॥ऋषि-मुनि करुनी नेम ॥धृ॥ अतिथी आला भोजनकाली ॥ जात न

पुसता भोजन घाली ॥ तुष्ट अशाने हो वनमाली ॥ पवित्र होइल धाम ॥१॥ विविधाचरणे शास्त्री कथिली ॥ वंद्य तयातुनि घ्यावी वहिली ॥ निंद्य त्यजावी कृपासाउली ॥ करील सीताराम ॥२॥ सोडुनिया सत्कर्माचरण ॥ अपघाताने येईल मरण ॥ होउ न द्या याचे विस्मरण ॥ स्मराच प्रभुचे नाम ॥३॥ धर्माचरणे सुखी जाहले ॥ इतिहासी कितितरी दाखले ॥ पूर्वज पथ हा देइ सुखफले ॥ करील सर्वहि क्षेम ॥४॥ ऐसा गुरुने त्या विप्राला ॥ नियमाचार समग्रहि कथिला ॥ अल्पाचिया पद्यात गोविला ॥ देइल हा आराम ॥५॥

अध्याय ३७ वा—पद्य ५ वे

( चाल—चंद्रकांत राजाची कन्या )

शास्त्री कथिलें जसे आचरण वागावे त्यापरी ॥ स्वधर्ममार्गे नित वागावे तरण्या भवसागरी ॥धृ॥ गायत्री जप देव पूजनी संध्या वंदन करी ॥ सूर्योपासनि आरोग्याते मिळवा हो झडकरी ॥ त्रिकाल संध्या ब्राह्मण क्षत्रिय वैश्यातें कथियली ॥ नित्यनेम हा सतत असावा सहज तराया कली ॥ गृहस्थधर्मे वागुनि अतिथी सत्कारहि तो बरा ॥ कुलस्वामिची उपासना ही देइल सद्गति वरा ॥ प्रातःकालापासुनि रात्रौ शयनावरि आचरा ॥ धर्मशास्त्री नियमाते लिहिले पाहुनि वागा जरा ॥ समस्त धर्मप्रतिपालन हे मुनिना नच साधले ॥ यथाशक्ति आचरणी झाले श्रेष्ठ थोर ते भले ॥ दुर्धर कलि हा धर्माचरणा वेळ नसे फारसा ॥ परि त्यातुनिही आचरती जे समय काढुनी

कसा ॥ धर्माचरणी तेज-धन-तसे आरोग्यहि साधते ॥ सुबुद्धि-मार्गे इहपरलोकी कल्याणहि लाभते ॥ भलत्या मार्गे नका वागुहो सज्जन तुम्हि शाहणे ॥ संस्कृति रक्षणि तयार व्हावे कृष्णाग्रज हा म्हणे ॥ १ ॥

अध्याय ३८— वा—पद्य ६ वें

( चाल— केशवकरणी अघटित लीला )

अनेक परिच्या समाराधना होती गाणगापुरी ॥ नित्य किति येति भक्त गुरुघरी ॥धृ॥ अनंत पुरती मनोकामना भजकां ज्या अंतरी ॥ सोहळा असा चालला परी ॥ भास्कर नाम अशातचि आला विप्रपुरी भीतरी ॥ नवस तो फेडाया बहु दुरी ॥चाल॥ आणिला तिघांपुरताच शिधा संगती ॥ दरबारि तयाची लागेना संगती ॥ जेविती नित्य बैसुनिया जन पंगती ॥ रात्रौ निद्रा करी घेउनी गाठोडे शिरतळी ॥ दिवस ना शून्य मिळे त्या स्थळी ॥ १ ॥ चेष्टा करिती विप्र तयाची गुरुला जेववु आला ॥ स्वये जेवुनी तृप्त हो भला ॥ ऐकुनी श्रीगुरु वदती त्याला आज घालि भोजना ॥ वृथा कां चालविशी ब्राह्मणा ॥ ऐकुनिया संतुष्ट विप्र तो करी आयतीत्वरे ॥ त्रिवर्ग अन्न शिजवि सत्वरे ॥चाल॥ मनि भूसुर म्हणती आज बरे ना दिसे ॥ आम्ही निजगृही जेवावे योगचि असे ॥ परि श्रीगुरु मनिचे जाणावे कुणि कसे ॥ अपूर्व अतर्क्य श्रीगुरुमहिमा नवल कराया मनी ॥ योजिले आज गुरुस्वामिनी ॥ २ ॥ विप्रा वदती सांग आमंत्रण सर्वा या भोजना ॥ आज मी करिन

समाराधना ।। आज्ञा गुरुची सकला सांगे हसुनि विप्र बोलति ।। तिघा पात्रापुरतिच आयति ।। शीत नये वाट्यास एकहि लाज न वाटे तुला ।। निमंत्रण देशि धरुनि हेतुला ।।चाल।। मग आले भोजना गुरु तै लाघव करी ।। प्रत्यक्ष अन्नपूर्णेसि निमंत्रण करी ।। पातली माउली त्या पाकाभीतरी ।। चार सहस्रां जेवण घालुनि उरले जितुके असे ।। अमित जन गाति कुतुक फारसे ।।३।। अंत्यजादि जनताहि जेविली जलचर संतोषले ।। अशी ही सुखद गुरु माउले ।। आशिर्वच विप्रास गुरुमुनी देती पुत्र-पौत्रही ।। धनी तो नांदे सुमुदित मही ।। भजेल धरूनी जशी भावना पावणार गुरु तया ।। दुरितही जाय सत्वरी लया ।।चाल।। प्रार्थितो सज्जना जोडुनि दोन्ही कर ।। निज सुखास्तव तरी व्हा गुरुपद किंकर ।। इह पर सौख्याचा दाता अभयंकर ।। कृष्णाग्रज हा विनवी तुम्हांला ठेवा सद्भावना ।। सहज त्या पुरतिल मनकामना ।। ४ ।।

अध्याय ३८ वा—पद्य ७ वें

( राग—भैरवी ताल—त्रिताल )

सज्जन हो घ्या गुरु हा सदां ।। चुकवा संसृतिच्या आपदा ।।धृ।। विश्वास असूद्या मानसी ।। सुखद हा खरोखर-मानिसी ।। तूं जसा तसा या शांतिदा ।।१।। कृष्णाग्रज गुरुचा दास हा ।। कवनि या विनवि सुजना महा ।। स्मरुनी या साठवा संपदा ।। २ ।।

।। दिवस पांचवा समाप्त ।।

# दिवस सहावा

## अध्याय ३९ वा—पद्य १ लें

(चाल—कार्तिक पौर्णिमा)

शौनकगोत्री द्विज होता गणगग्रामी ॥ गंगा नामे तत्पत्नि पतिव्रता नामी ॥ ध्रु.॥ वय झालें वर्षें साठ पुत्र ना कन्या ॥ वांझोटी म्हणुनी हिणविति तिज सामान्या ॥ पतिसेवा कारि बहु व्रतें तिनें आचरिलीं ॥ परि दैवबले संतानेच्छा नच पुरली ॥ ॥चाल॥ येतसे दर्शना नित्य ॥ गुरुपदी ॥ हासुनी विचारिति नाथ ॥ तिजप्रती ॥ काय वासना तव चित्ती ॥ संप्रती ॥ ती म्हणे नसे भाग्यात कांहीं संतान ॥ पुढिले जन्मीचे सेवनिया संधान ॥ १ ॥ ऐकुनि वदति गुरु या जन्मिच सुत कन्या ॥ होईल तुलागे होय जगी या धन्या ॥ अश्वत्थासह आम्हास नित्य सेवावे ॥ फळ मिळेल सत्वारि अपुल्या पदरी घ्यावे विश्वास ठेवुनि सेवी गुरु अश्वत्थ ॥ कारि प्रदक्षिणा पूजुनी ठेवि मन स्वस्थ ॥ गुरु प्रसाद देती दोन फळें तिजलागी ॥ भक्षण करण्या तिज सांगति सद्गुरु योगी ॥ चाल ॥ भक्षिता फळें ती नारी ॥ त्या दिनी ॥ अस्पर्श होत नवलाची ॥ कामनी ॥ कौतुका लोक बहु गाती ॥ क्षणक्षणी ॥ पाहिले न ऐसे नवल आज दिसलेसे ॥ साठ वर्षि नारी सुतवति होईल हर्षे ॥ २ ॥ जाहला तिला तो पुत्र प्रथम मग कन्या ॥ गुरुच्या चरणी ती घालि जाहली मान्या ॥ कल्पवृक्षतळि सर्वही कार्य हो पूर्ण ॥ सकलेच्छा पुरविल सहजाचि गुरुवर तूर्ण ॥

कन्यासुत झाले मान्य थोर या जगती ॥ विद्वद्वर झाले चहु राष्ट्रीं तत्ख्याती ॥चाल॥ यास्तव सेवा जन सारे, भाविक ॥ तारणार दुसरा कोणी ॥ नाविक ॥ गुरुविणे नसे की अन्य ॥ सत्सुख ॥ कृष्णाग्रज विनवी यथामती कथनात ॥ कां भटकतु-सा मायामय घोर वनात ॥ ३ ॥

अध्याय ४० वा—पद्य २ रें

(चाल—अहो ही माया.)

कुष्ठ रोगाने। विप्र त्रस्त झाला ॥ शरण गुरुपदीं नमायाला॥ ध्रु.॥ वदे महाराजा। मुख न कुणी पाहती। पीडिलो मयद्दावि रोग अती ॥पूर्वजन्मीचा । साठा दुरिताचा । कळेना किती आहे साचा॥ गुरु त्या वदती। दुरित जाय दूर। साधनें शास्त्रीं भरपूर ॥ सांगतो तैसे । करितां आचरण । होइल तुझे व्याधि-हरण ॥ दाविलें काष्ठ। सुकलें जीर्ण बहू । करी बा सेवा जा झणि हूँ॥ संगमातीरी। रोवि जमिनीत॥ अळें कारि पाणि घाल त्यात ॥ जधी या वृक्षा। फुटेल अंकूर। जाइल व्याधी ते दूर ॥ तथास्तु म्हणुनि। संगमीं तो गेला। करी औदुंबर सेवेला ॥१॥ सात दिन झाले। लोक वदति कोरे। ब्राह्मणा सुकले काष्ठ खरे ॥ कसे या फुटती । पल्लव या योगे। वृथा तप करिशि अनुरागें ॥ वदे तो वचन श्रीगुरुचे। ऐसे। वाटले करील त्या जैसे ॥ लोक गुरुपाशीं । येउनिया वदती। कशी या विप्रा होय गती॥ गुरुवर वदती। निष्ठा ज्या जशी । तयासी कळेल ती तैशी ॥ कथानक वदले। पुरातन जनाते। शबर गुरुनिष्ठा चरितातें ॥

शंभुचे लिंग। वनात सापडले । गृही त्या पूजुनि जे घडले ॥
चिताभस्माची । आवड पशुपतिला। भोला दावि चमत्कृतिला
एक दिनि न मिळे। चिताभस्म त्याते ॥ करावे काय उपा-
याते ॥ तयाची कांता । बोले सति सुगुणी ॥ देह हा अर्पिन
शिवचरणीं ॥ भस्म मम तनुचे । लावा शिवसांभा व्रती नच
होवो खोळंबा॥ मोद त्या झाला। जाळुनि निज सतिला। भस्म
लावुनि शंभु पुजिला ॥ नित्य नेमाने ॥ पाचारी सतिला ॥
आणि नैवेद्य उमापतिला ॥ तोंच ती आली ॥ नवल गमे फार
गुरुकृपा फळली त्या फार ॥ दर्शने शंभू ॥ शांतविती उभया ॥
तेवि या विप्रा होय जया॥ २॥

अध्याय ४० वा—पद्य ३ रें

(राग—काफी त्रिताल)

गुरुवर सदय महा ॥ त्वरित ते॥ पाहुनि निष्ठा त्या विप्राची॥
धावुनि येत पहा ॥धृ॥ निज करिच्या त्या कमंडलूतुनि ॥ अल्प
घालि जल त्या तरु जीवनि ॥ पल्लव फुटलें तयास त्या क्षणी॥
दिव्य चमत्कार हा ॥१॥ सुवर्णमय कांती विप्राची ॥ क्षणात
झाली सुंदर साची ॥ पाया पडुनी पदरज याची ॥ उठविति
त्यासि महा ॥२॥ क्षणात सुंदर तो औदुंबर ॥ पूजिति त्याते
किति नारीनर ॥ भाविक भक्तां कल्पतरुवर ॥ याचिति वर
समुहा ॥३॥ भावे जैसा देवा मानव ॥ पावे तैसा गुरु कारे
लाघव ॥ अनन्यगतिका प्रसन्न माधव ॥ होतो साक्ष पहा ॥४॥
कलियुगि नास्तिक मते वाढली॥ नीति अनीति चाड न उरली॥

थोरांची मति भ्रष्ट जाहली ।। भोगिति भवताप हा ।।५ ।। स्तोत्रे केली अपार त्याने ।। शाही सेवनि आनंदाने ।। कृष्णाग्रज कवि त्याचे गाणे ।। गायं यथामति हा ।। ६ ।।

अध्याय ४१ वा—पद्य ४ थें.

( चाल—फटका )

गावे तो तो गुरुलीलामृत गोड इक्षुदंडापरिस ।। सिद्ध सांगती नामधारका कथा पुढे कीं तू परिस ।। धृ ।। पूर्वज तव सायंदेवाभिध सेवा कारि गुरुचरणाची ।। गुरु वदती बा कठिण गुरुव्रत आचरील त्या सुफल रची ।। दृढ ठेवीं विश्वास तो म्हणे करीन सेवा गुरुराया ।। असा राहिला गाणगग्रामी सत्व पहाया रचि माया ।। संगमि असतां पर्जन्याची होय वृष्टि बहु त्या दिवशी ।। शिष्या वदती थंडि वाजते जाहलि बारे मध्यनिशी ।। जाउनि ग्रामी अग्नि आण जा करका-माजी घालुनिया ।। द्वारपाल देतील तुला बा पाहिन मार्गा तव उभया ।। वीजप्रकाशे संथ चालिला घेउनि अग्नि करकात ।। संगमाजवळि येता पाहे उभयभागि हो भयभीत ।। नागराज पाहोनि भयंकर धावत येई गुरुपुढे ।। गुरु वदती हासुनी काय बा मनी आणिले आज कुढे ।। तव संरक्षण करण्या आम्ही दोन नाग तुजसवे दिले ।। भीति नसो तुज नमुनि नाग ते सत्वर पाहाति स्वीयविळे ।। कठिण असे गुरु सेवायाला ऐक सांगतो तुला कथा ।। त्वष्ट्रा ब्रह्मपुत्र गुरुकृपे घालवि अपुली कशी व्यथा ।। १ ।।

अध्याय ४१ वा—पद्य ५ वें

(चाल—चंद्रकांत राजाची कन्या.)

गुरुगृहि असतां शिष्यवर्गाचें सत्व पहाया गुरु वदती ॥ दृढगृह आम्हा निर्मुनि देई कधि न गळे ऐशा रीती ॥धृ॥ नयन मनोहर नित्य असो स्थिर साहित्यासह कारि बाळा ॥ गुरुपत्नी त्या म्हणे कंचुकी शिवलि न विणली आणि मला ॥ गुरुसुत बोले आणि पादुका म्हणेन तेथे ज्या जाती ॥ गुरुकन्या मागे तानवडे तसेच घरकुल बहु प्रीती ॥ अंगिकारि सुत तथास्तु म्हणुनी शोध कराया निघे वनी ॥ आठवि गुरुच्या चरणा मानसि तारक तूच मला विजनी ॥ अवचित देव तयावरि द्रवला गुरुनिष्ठा ती पाहोनी ॥ म्हणे बालका श्रीहरि तोषे हेतू पुरतिल मोदवनी ॥ काशीयात्रा करी जाय बा विश्वनाथ कृपया सर्व ॥ होती मनोरथ सफळ तुझे बा दया करिल तुजवरि शर्व ॥ कशी करावी काशीयात्रा कवण्या तीर्थी कवण दिनी ॥ स्नान करावे चतुर्दिशेला पंचक्रोशी वदत मुनी ॥ आणुनि सोडिति त्या काशीला गुप्त जाहले सिद्ध मुनी ॥ यात्रा करण्या बाळ निघे मग विश्वेश्वर चरणा नमुनी ॥१॥

अध्याय ४२ वा.—पद्य ६ वें

(चाल—धावत येइ सख्या)

यात्रा करि परिपूर्णा ॥ बालका ॥ गंगास्नाने विविधदर्शनें ॥ तोषवि सकला देवा तूर्णा ॥धृ॥ अपार तीर्थे काशी क्षेत्री ॥ देव मंदिरे पूर्ण धरित्री ॥ स्नाने दानें करिति पवित्री ॥ होति वासना पूर्णा ॥ २ ॥ खंड दहावा मुक्तिपुरीचा ॥ प्रथित

पुराणि वदला साचा ॥ अपार महिमा त्या तीर्थाचा ॥ जागृत शिव नि अपर्णा ॥३॥ भक्तीपूर्वक यात्रा करिता ॥ प्रसन्न शंकर होय तत्वता ॥ माग मागरे धन्य गुरुसुता ॥ हृदि त्या धरित अपर्णा ॥४॥ कष्टलासि बाळा गुरुसाठीं ॥ म्हणुनि जाहलि ईश्वर भेटी ॥ ह्या वस्तू तव गुरुच्यासाठीं ॥ निर्मियल्या बहुवर्णा ॥५॥ घेउनि आला नमुनि शिवाला ॥ यात्रा गमली सफला सकला ॥ वस्तु गुरुस दे ज्याच्या त्याला ॥ शिर पदी ठेवी पाव दयार्णा ॥ गुरुकृपेचा वरहि लाधला ॥ सकला विद्या सहज तयाला ॥ आल्या ऐसा गुरुजिव्हाळा ॥ वाजवितो कृष्णाग्रज कर्णा ॥७॥ सायंदेव असा गुरुदास ॥ राही गाणगभुवनी खास ॥ स्तोत्रे करि बहु भवी उदास ॥ नित्याचि पूजी गुरुच्या चरणा ॥८॥ पूर्ण कृपा गुरुचीहि पावला सुत स्त्रीसह मग तिथे राहिला ॥ श्रीगुरुमाहिमा असा गाइला ॥ चुकवी जो जनि मृति भय शरणा ॥९॥

### अध्याय ४३ वा—पद्य ७ वें

( चाल—फटका )

होती त्या दिनि चतुर्दशी तिथि अनंतपूजा जन करिती ॥ व्रत महात्म्य शिष्याते गुरुवर सांगत होते अति प्रीती ॥ धृ ॥ शुद्ध भाद्रपद चतुर्दशीला पूजावा दोरक ऐसा ॥ अनंतव्रत हें प्रसिद्ध जगती पांडवपालक व्रत परिसा ॥ अपर उदाहरणे गुरु सांगे कौंडिण्याची नवलकथा ॥ सत्वशील विप्रास लाधली स्त्री बहु कर्कश देइ व्यथा ॥ प्रथम पत्निची कन्या साची नाम

सुशीला गुणवंती ।। तीसहि त्रासवि कर्कश नारी कर्माची ही अशी गती ।। अकस्मात कौंडिण्यमुनींते पाहुनि अर्पी निज कन्या ।। विवाह होता नमुनि पित्याला निघे जावया पति मान्या ।। काहि न दे कर्कशा मुलीते कोंडा घाली पदरात ।। तोच घेउनी जाय सुखे ती मार्गी पतिपत्नी सुमत ।। नदी तटाकी व्रत पाहुनिया करिती नारी त्यांस पुसे ।। अनंत देवा पूजितसो आम्हि इच्छित सकलहि पुरवितसे ।। तीहि तयासह पूजी देवा नवल दोरका बांधि करी ।। व्रतप्रभावे प्रसन्न झाला अनंत तिजवारि कृष्णहरी ।। राज्य प्राप्त जाहले सहज त्या वैभव सौख्य घरा आले ।। नांदति उभयहि हर्षभराने कौंडिण्य ऋषी नृप झाले ।। अनंत कृपया असे लाधले सुख भाग्या आली भरती ।। दुर्दैवे करि सूत्र पाहुनि विप्र बोलिला स्त्रियेप्रती ।। वशीकरण आम्हासि कराया दोरा बांधिसि हातात ।। तोडुनि टाकी अग्नित कोपे हाय अनंता ती म्हणत ।। तिनें विझविला दुग्धि टाकिला परी कोपला प्रभुराया ।। क्षणात गेले राज्यैश्वर्यहि सौख्य सर्व विलया जाय ।। पश्चात्तापे शरण रिघे मग अनंत प्रभुते भेटाया ।। निर्वाणी प्रभु तया भेटला शरणांगत लोळे पाया ।। चुकलो मागे क्षमा दयाळा मदांधपण आले माते ।। शरण चरणि विसरे न कधीं तुज उठवि हरी मग विप्राते ।। पुन्हा प्रभू मग त्या सौख्याते देति पावती सुगतीते ।। शिष्यवरा ते गुरु सांगती करा व्रत धरा सुमतीते ।। कृष्णाग्रज विनवी सुजनाते सुरस गातजा गुरुलीला ।। कठिण जरी भव सहज तराया भीति जयाची कलिकाला ।। १ ।।

अध्याय ४३ वा—पद्य ८ वें
( राग—भैरवी ताल—त्रिताल )

भक्त असा रमला । गुरुपदी ॥ सेवा सुमनें करिता पावे ॥ देई सकल फला ॥ धृ ॥ नामधारका सिद्ध सांगती ॥ गाणगापुर बहु पावन जगती ॥ गुरुनाथांची तेथे वसती ॥ अभयपद पुण्यस्थला ॥१॥ कृष्णाग्रज हा तत्पद किंकर ॥ जोडुनिया प्रार्थी सकला कर ॥ गाहो प्रेमे हा गिरिजावर ॥ त्रिमूर्ति घ्या सुफला ॥२॥ सायंदेवाचा वंशज हा ॥ नामधारकहि वदे सुखद हा ॥ गुरुचरित्र बहु गोड ग्रंथ हा ॥ गानि स्मरा विमला ॥ ३ ॥

॥ दिवस सहावा समाप्त ॥

# दिवस सातवा

अध्याय ४४ वा—पद्य १ लें
( चाल—ऐशी देवदया. राग—सारंग ताल—धुमाळी )

कोष्टी जातीचा । गुरुभक्त । होता त्या नगरीत ॥ सेवी भावबलें गुरुराया । नित्य झाडि गुरुठाया ॥ आले शिवरात्री । व्रत मोठे ॥ यात्रेसी जन नेटे ॥ श्री शैल्या जाती ॥ त्या म्हणती ॥चाल॥ आम्हा सांगाती ॥ तो वदला मजला, गुरुसेवा ॥ न भजे अन्या देवा ॥ लोकहि मग जाती ॥ श्री शैल्या ॥ सेवी गुरु कैवल्या ॥ शिवरात्री दिवशी ॥ गुरुराव ॥ करिती बहु नवलाव ॥ शिष्यवरासंगे ॥ सहजगती ॥ नभमार्गे यति सुमती, श्री शैल्या आले ॥ त्या वदले ॥ जा धरी शिवपाउलें ॥ तोही शिवलिंगी ॥ कारि पूजा ॥ पाहि तिथे गुरुराजा ॥ परिचित जन सारे ॥ म्हणति अरे ॥

छपुनी आला कां रे ।। परि तो नच वदला ।। काहिच कीं ।। उरे परतणे बाकी ।। मग त्या गुरुराज ।। कथामृते ।। सांगति शिव चरिताते ।। राव विमर्षण तो ।। स्त्रीसहित ।। शिवकृपया उद्धरित ।। ज्याने निज सतिला ।। सन्मतिला ।। सप्तजन्म क्रम कथिला ।। शिवव्रतपुण्ये तो ।। सहज तरे ।। दुरितां ठावाचे न उरे ।। ऐसा शिवमहिमा ।। गुरु गरिमा ।। श्रीशैल्या धरि प्रेमा ।। ऐकुनि पाय धरी ।। तूं न हरी ।। गुरुराया मज तारी ।। परत पुन्हा आले ।। संध्येते ।। जणु कां गांविच होते ।। ऐसी गुरुलीला ।। नव नवति ।। भक्त किती अनुभविती ।। कृष्णाग्रजदास ।। सुजनास ।। घालि यथामति घास ।। गुरुचरितामृत हे ।। पद्यमय ।। देइल तुम्हा अभय ।। १ ।।

### अध्याय ४५ वा—पद्य २ रें

( चाल—चंद्रकांत राजाची कन्या )

सिद्ध म्हणे बा नामधारका अमृतसम गुरु कथारसा ।। सेवित जा प्रतिदिनि स्वानंदे स्वाद न ऐसा इतर रसा ।। धृ ।। नंदी नामा विप्र कुष्ठयुत सेवी तुजला जगदंबा ।। तीन वर्ष पूजिली ती म्हणे सेवि चंद्‌ला श्रीअंबा ।। सात मास ध्यातसे चंद्‌ला म्हणे माय घालवि रोग ।। तीहि म्हणे जा गाणगग्रामी सरेल तेथें तव भोग ।। असती श्रीगुरु सिद्धस्थानी तारक ते कलिकालात ।। क्रोधे विप्रहि म्हणे नवल हे ऐकिली न ऐशी मात ।। सत्व न उरले देवामाजी नरां समिप जा म्हणावया ।। लाज न वाटे आश्चर्यचि हे कोण करिल मजवरी दया ।। हटे पुन्हां तप करी अंबिका भोपियांस सांगे हकलां ।। गाणगपुरि जा त्या सांगावे व्यथा जाय तेथे सकला ।।

शेवटी आला गंधर्वपुरी गुरुचरणी संदेह मने ।। प्रभु वदती कां शरण नराला ऐकूनि त्यांचे चित्त भ्रमे ।। लोळे मग धरणीवारि चुकलो म्हणे दयाळा तारि मला ।। दीनदयाळु शिष्या वदती संगमि घाला स्नान यया ।। वस्त्रें फेका दूर अपर द्या आणा पंगतीस जेवाया ।। सिद्धानुष्ठाने हा ब्राह्मण पूत असे गत पाप लया ।। स्नाने व्याधी गेला एका जंघेसी किंचित उरले ।। म्हणे गुरुवरा रुसला कां हो, पूर्ण दुःख कां नच सरले ।। गुरु वदती संदेह तुझा तुज बाधक झाला कवन कारि ।। दिव्य विभूती खाण्या देती कवित्व शक्ति आलि वरी ।। नानापरि स्तोत्रें कारि गुरुची राहि गुरुच्या सेवेत ।। उरले ते दुःख ने निमाले पुरले तन्मनिचे हेत ।। कृष्णाग्रज हा यथामतीने गाय सद्गुरुंच्या लीला ।। सज्जन सारे याहो धाउनि ऐका या नव गुणशीला ।। १ ।।

अध्याय ५८ वा—पद्य ३ रें

(राग—काफी ताल—त्रिताल)

अपर कवी पुरि आला ।। ऐसा ।। नरकेसरि त्या नामहि परगी ।। कवनी गाय शिवाला ।। धृ ।। निंदी गुरुवरा भोंदु मानुनी ।। विश्वनाथ कल्लेश्वर पुजुनी ।। एक देव शिव नेणे त्याहुनि ।। दुजा न पाहे डोळा ।। १ ।। लोक वदति त्या कविरायाते ।। श्रीगुरु मानिति बहु कवितेते ।। स्तुति कारि त्यांची प्रसन्नचित्ते ।। लाभशील अभयाला ।। २ ।। तो वदला मी शिवा सोडुनि ।। नरापुढे कां हात जोडुनि ।। पदर पसरु मम सुंदर कवनी ।। योग्य न गमे मनाला ।। ३ ।। मग एके दिनी नवल जाहले ।।

कल्लेश्वरी श्रीगुरुच दिसले ॥ नेत्र उघडुनी पहाता भ्रमले ॥ बघता गुरुरूपाला ॥४॥ गुरु वदती कां आम्हा पूजिशि ॥ म्हणे भ्रांत होवोनी मानसी ॥ गुरु कल्लेश्वर एकचि ऐशी ॥ खात्री पटे जीवाला ॥ ५ ॥ धावत आला गाणगभुवनी ॥ राहे सेवुनि गुरुपद कवनी ॥ आवडला बहु गुरुला स्वमनी ॥ आश्रय दिला तयाला ॥६॥ भीमातटवासी गुरुस्वामी ॥ तारक सकला अंतर्यामी ॥ भावे करिता भक्ती नामी ॥ सहजचि देइ यशाला ॥७॥

अध्याय ४७ वा—पद्य ४ थें

( चाल – केशवकरणी अघटित लीला )

सण दिपवाळी बहु आवडता लोक जाति निजगृही ॥ विचारुनि भक्त सुजन विग्रही ॥ धृ ॥ नरक चतुर्दशि स्नान कराया यावें निजमंदिरा ॥ सकलही प्रार्थिति सद्गुरुवरा ॥ सात लाडके भक्त गुरुचे गुरु वदले येइन ॥ मठातहि म्हणती मी राहिन ॥चाल॥ हे होइल कैसे न कळे शिष्याप्रती ॥ गुरुची गुरुलीला अज्ञ कसे जाणती ॥ सप्तगृही गेले मठातही राहती ॥ अष्टरूप धारि एक समयि प्रभु आले स्नान सारुनी ॥ पुन्हा मठि एकरूप गुरुमुनी ॥१॥ कार्तिकमासी आले परतुनि शिष्य वदती गुरुवरा घातले आम्ही स्नान निजधरा ॥ सातहि वदती मीच पूजिलें दिलें वस्त्र हे पहा ॥ सातहि वस्त्रें दिसती महा ॥ मनी समजले अष्ट रूप हे झाले सहजचि हरी ॥ भक्त वरदानि असा नरहरी ॥चाल॥ नानाविध लीला ऐशा गुरुच्या घरी ॥ भजकाते पावे नवसाते सत्वरी ॥ घ्या अनन्य जन हो गुरुलीलामृत करी ॥ प्या अमृत हे गुरुचरिताचे तराल भवसागरी ॥ अशी कृष्णाग्रज विनंती करी ॥२॥

अध्याय ४८ वा—पद्य ५ वें.
(चाल—केशवकरणी)

गुरुलीलामृत कर्ण मनोहर ऐकुनि भवभय हरे॥ सहज मानव हा संसृति तरे ॥ धृ ॥ अनन्यभावे गुरुपद नमिता सुखवी सौख्यद वरे ॥ व्यर्थ कां होता मग घाबरे ॥ आली धावुनि गुरु-गुणसरिता स्नान कराया त्वरे ॥ आळशावरि जणु गंगा झरे ॥चाल॥ शूद्र भक्त होता गाणगि गुरुसेवक ॥ शेतीत नित्य कारि कष्ट नसे दांभिक ॥ गुरु जाति संगमी त्वरे नमे भाविक ॥ एके दिनि त्या वदती कारे इच्छा तव मानसी ॥ काय वद सत्वर फळ पावशी ॥ १ ॥ तो वदला बहु धान्य पिकावे शेति भरावी पुरी ॥ दैन्य मग जाइल सहजचि दुरी ॥ तथास्तु म्हणुनी हासुनी म्हणती ऐके वच जे मम ॥ आचरी करुनी मन निर्मम ॥ कापी सगळे पीक उभे हे येइन परतुनि तव ॥ सांगुनि गेले गुरु अभिनव ॥चाल॥ तो शस्त्र करी घे कापी निज शेतिला ॥ स्त्रीपुत्र अडविती त्यजिता कां रीतिला ॥ पाटिल समजावी घालुनिया भीतिला ॥ अवेळीं कापणि नको करू रे तो वदला मी धनी ॥ आले जे करीन माझ्या मनी ॥ २ ॥ गुरु मध्यान्ही परतुनि आले शेत सर्व कापिलें ॥ धावुनी धरितो गुरुपाउले ॥ मुनि वदले बा सहज बोललो घास व्यर्थ नासला ॥ वदे तो आज्ञा तुमची मला ॥ जशी भावना तुझी असे रे होइल फललाभ तो ॥ गुरुचा पुत्र खरा शोभतो ॥चाल॥ मग आठ दिनावारि शीत अती पातले ॥ सकलांच्या शेतित पीक सर्व नासले ॥ पर्जन्ये उरले-तेहि सर्व ग्रासिले ॥ एकेक फणा अनेक फरगडि शूद्र शेत तै

पिके ।। पाहती अपार जन कौतुके ।।३।। शत गुण आलें धान्य तयाला नवल जाहले महा ।। गुरुचा कृपाप्रसादचि पहा ।। मग पूजिति गुरु मठात येउनि नमे घडि घडि स्मरे ।। तारिले बापा अभयपद करे ।। प्रसन्न शूद्रे धान्य वाटिले गावां-भीतरि किती ।। तयाची लोकहि करिती स्तुती ।।चाल।। हा गुरु-कृपेचा मेवा त्या लाभला ।। विश्वास असा त्या धन सुखदचि साधला ।। अजुनीहि मागतो पिके बहुत चांगला ।। अनन्य भजकां श्रीगुरुस्वामी अभयद कीर्ती अशी ।। गात जा पडू नका हो फशी ।।४।।

अध्याय ४९ वा—पद्य ६ वें (राग—सारंग·ताल—धुमाळी)

गुरुवर वरदानी ।। त्या नगरी ।। राहति जग कैवारी ।।ध्रु।। सिद्ध स्थान असे ।। विख्यात।। गाणगपुर ते महत।। तीर्थं अष्ट महा ।। दिव्य पहा ।। स्नाने सुखविति देहा।। नामे ऐक सुता।। सिद्ध म्हणे।। ऐके सुत तुष्टपणे ।। भीमाऽमर जाती ।। श्रेष्ठ अती ।। अमृतातुनि-उत्पत्ती ।। जल ते व्याधि हर ।। त्या नदिचे ।। स्नाने मुक्तिद साचे ।। पुढती मनोहर ।। तीर्थ असे ।। स्नाने दुरित विनाशे ।। संगमेश्वर दुसरे ।। श्रेष्ठ शिव ।। पुजिल्या देतो विभव ।। वाराणशि तिसरे ।। या स्थानी ।। पुण्य काशिसम स्नानी ।। पाप विनाशी ते ।। तीर्थ पुढे ।। स्नाने सुकृत वाढे ।। रत्ना गुरुभगिनी ।। या स्थानी ।। उद्धरली कीं स्नानी ।। कोटी तीर्थ पुढे ।। श्रेष्ठ अती ।। सकल तीर्थमय ख्याती ।। पुढती रुद्रपद ।। रम्य असे ।। स्नान करावे नवसे ।। सुचक्र तीर्थ पुढे ।। बहु गाढे ।। अस्थि टाकण्या

उघडे ॥ मन्मथदहन असे ॥ ते खासे ॥ कल्लेश्वर सन्मुखसे ॥ ऐशी तीर्थें ही ॥ रमणीय ॥ म्हणुनि राहि गुरुराय ॥ गाणगि यात्रेत ॥ ही तीर्थें आचरणे की भक्ते ॥ कृष्णाग्रज गाई ॥ हा महिमा ॥ पुरण्या मनिच्या कामा ॥ १ ॥

अध्याय ५० वा.—पद्य ७ वें (राग—काफी ताल—त्रिताल)

रजक भक्तवर गुरुचा ॥ सज्जन ॥ गुरु वरदाने नृपपद पावे ॥ यवन होय जातीचा ॥धृ॥ हिंदु यवन जन समान पाळी ॥ द्वेषा न करी कुणा ना छळी ॥ हिंदु देवता वंदी भाळी ॥ प्रिय तो सकल प्रजेचा ॥१॥ ऐसे असता झाला स्फोटक ॥ मांडिवरी त्या दिसे भयानक ॥ उपाय केले नाना सम्यक ॥ बरवा होनच साचा ॥२॥ वदले द्विज त्या गाणगवासी ॥ असती श्रेष्ठ एक संन्यासी ॥ दर्शनि त्यांच्या सहज विनाशी ॥ ऐकुनि सुमुदित वाचा ॥३॥ संतदर्शने व्याधी हरण ॥ होइल जावे त्याते शरण ॥ भद्रायू नृपसुत उद्धरण ॥ संत कृपारस साचा ॥ ४ ॥ ऐकूनि धावे गाणगभुवना ॥ गुरुपद पाहे सत्वर नयना ॥ का रे रजका ओळखशी ना ? ॥ पूर्वजन्म वर साचा ॥ ५ ॥ लोळे गडबड गुरुच्या पायी ॥ तव कृपेला सीमा नाही ॥ शास्त्र पुराणी ऐशी ग्वाही ॥ नसो विसर चरणाचा ॥६॥ यावे नाथा मम नगरीत ॥ पूजिन मीही स्वगृही हर्षित ॥ गुरु वदती बा तव जन मर्षित ॥ करितिल तुज बहु जाचा ॥७॥ आग्रह त्याचा जाणुनि गुरुवर शिबिकेमाजी बसती मनोहर ॥ पायी चाले नृपति बरोबर ॥ भाव असा यवनाचा ॥ ८ ॥ लोकहि करिती कौतुक सारे ॥ गुरुभक्तीचे ऐसे वारे ॥ संताजवळी भेद कसा रे ॥

आत्मा सर्वांतरिचा ॥९॥ भावे पूजी गृही नेवुनी ॥ बैसवुनि सर्वोच्च आसनी ॥ सुगंधमाळा गुंफुनि सुमनि ॥ झाला भक्त सदाचा ॥१०॥

अध्याय ५१ वा—पद्य ८ वें (चाल—फटका)

सिद्ध नामधारका सांगती ऐके प्रेमळ गुरुभक्ता ॥ अता रहावे गुप्त जनांतरि वाटे मनि मग गुरुनाथा ॥ धृ ॥ पाहुनि भक्ता सचिंत वदती आम्ही नित्य येथें राहू ॥ गुप्तपणे जो करलि सेवा कृपादृष्टि त्यात पाहूं ॥ नाना याती लोक इथे येतील उपद्रव होय अती ॥ प्रगट जातसों श्रीशैल्याते म्हणुनिच ऐशी धरिलि मती ॥ जो जो गाइल लीला अमुची करील सेवा आनंदे ॥ लीलामय ग्रंथाते पूजिल त्या गृहि राहिन मी मोदे ॥ पूर्ण मनोरथ करीन त्यांचे वचन सत्य माझे माना ॥ धर्म सत्य सेवने यशस्वी जगात पावा बहुमाना ॥ नित्य संगमी स्नान आमुचे मठात येउ जेवाया ॥ पुरवू इच्छा शरण जनांच्या सेवितील जे या ठाया ॥ गुरुचरित्र ग्रंथाचे पुजन भजन आमुचे जया घरी ॥ वसती अमुची त्या गृहि राहे भाक देतसो तुम्हा खरी ॥१॥

अध्याय ५२ वा ( चाल—फटका )

श्रीशैल्या पातले श्रीगुरु पुष्पासनि जलि बैसुनिया ॥ निघते झाले शिष्य पाहती अश्रूपूर्ण नयने सदया ॥ धृ ॥ मठी पादुका निर्गुण असती आमुची वसती त्यात सदा ॥ नित्य पूजिनी भजनी त्यांच्या नासतील सर्वहि विपदा ॥ सांगुनि गेले प्रसाद सुमनें परत आली शिष्या हाती ॥ घेवुनि वंदिति मस्तकि मग ते

सात शिष्य ते प्रख्याती ।। संवत्सर बहुधान्यनाम ते माघ वद्य प्रतिपदा तिथी ।। शुभदिनी शुभ घटकेला गेले निजानंदि गुरुवर सुमती ।। अर्जुनीही दृष्टांत वरोघर गाता गुरु गुण होतात।। नाना विपदी भक्तां तारी सज्जन हो ऐका मात जागेश्वर सुत नरहरि कवि हा माता पार्वती लाभ महा ।। उदरि तयांच्या जन्म जाहला कृपाप्रसादची त्याचा हा ।। अमरावति ती विशाल नगरी वऱ्हाड देशी प्रथित असे ।। श्रीअंबा स्वामिनी तेथिची सिद्धस्थान बहु श्रेष्ठ असे ।। श्रीजगदंबा तुळजा माता कुलस्वामिनी वरदानी ।। श्रीगुरु टेंबे स्वामी दयाघन द्रवले मजवरि गुण खानी ।। कृपे ययांच्या पूर्ण जाहला ग्रंथ गुरुचरित पद्यमय ।। दुरित जगाचे जावो गाता देवो सकलां हा अभय ।। गुरुचा आशिर्वाद असे या गाइल प्रेमे ग्रंथवरा ।। सप्ताही वा एक पद्य जरि कृपा करिन त्या वरिवरा ।। कृष्णाग्रज कवि प्रार्थि पुन्हा की नित्य पूजनी या ठेवा ।। सर्व सुखाचा गुरुकृपेचा खा रवा सुरस असा मेवा ।। १ ।।

अध्याय ५२ वा—पद्य १० वें

( चाल—अहो ही माया ) [ नित्यपाठाकरिता अवतरणिका ]

प्रथमाध्यायी । मंगल गुरु स्मरण ।। भेटती शिष्या गुरुचरण ।। द्वितीयाध्यायी । कठिण गुरुसेवा । संदीपक करि धरि भावा ।। तृतीयाध्यायी । अंबरीष महिमा । चतुर्थी दत्तजन्मगरिमा ।। पंचमाध्यायी ।। जन्मति श्रीपाद ।। षष्ठी तीर्थि फिरे वरद ।। सप्तमी जाती । गोकर्ण क्षेत्री । भूपचांडाली सुपवित्री ।। अष्टमी तारी । मूर्खा उपदेशी ।। शनिप्रदोषाते अति हर्षी ।। रजक नवमात ।। आशीर्वच लाहे ।। दशमी विप्रा जिववि स्वये ।।

आत्मा सर्वांतरिचा ॥९॥ भावे पूजी गृही नेवुनी॥ बैसवुनि सर्वोच्च आसनी ॥ सुगंधमाळा गुंफुनि सुमनि ॥ झाला भक्त सदाचा ॥१०॥

अध्याय ५१ वा—पद्य ८ वें (चाल—फटका)

सिद्ध नामधारका सांगती ऐके प्रेमळ गुरुभक्ता ॥ अता रहावे गुप्त जनांतरि वाटे मनि मग गुरुनाथा ॥ धृ ॥ पाहुनि भक्ता सचिंत वदती आम्ही नित्य येथें राहू॥ गुप्तपणे जो करलि सेवा कृपादृष्टि त्याते पाहूं ॥ नाना याती लोक इथे येतील उपद्रव होय अती ॥ प्रगट जातसों श्रीशैल्याते म्हणुनिच ऐशी धारिलि मती ॥ जो जो गाइल लीला अमुची करील सेवा आनंदे ॥ लीलामय ग्रंथाते पूजिल त्या गृहि राहिन मी मोदे॥ पूर्ण मनोरथ करीन त्यांचे वचन सत्य माझे माना ॥ धर्म सत्य सेवने यशस्वी जगात पावा बहुमाना ॥ नित्य संगमी स्नान आमुचे मठात येउ जेवाया॥ पुरवू इच्छा शरण जनांच्या सेवितील जे या ठाया॥ गुरुचरित्र ग्रंथाचे पुजन भजन आमुचे जया घरी ॥ वसती अमुची त्या गृहि राहे भाक देतसो तुम्हा खरी ॥१॥

अध्याय ५२ वा ( चाल—फटका )

श्रीशैल्या पातले श्रीगुरु पुष्पासनि जलि बैसुनिया ॥ निघते झाले शिष्य पाहती अश्रुपूर्ण नयने सदया ॥ धृ ॥ मठी पादुका निर्गुण असती आमुची वसती त्यात सदा॥ नित्य पूजिनी भजनी त्यांच्या नासतील सर्वहि विपदा ॥ सांगुनि गेले प्रसाद सुमनें परत आली शिष्या हाती ॥ घेवुनि वंदिति मस्तकि मग ते

सात शिष्य ते प्रख्याती ॥ संवत्सर बहुधान्यनाम ते माघ वद्य प्रतिपदा तिथी ॥ शुभदिनी शुभ घटकेला गेले निजानंदि गुरुवर सुमती ॥ अजुनीही दृष्टांत घरोघर गाता गुरु गुण होतात॥ नाना विपदी भक्तां तारी सज्जन हो ऐका मात जागेश्वर सुत नरहरि कवि हा माता पार्वती लाभ महा ॥ उदरि तयांच्या जन्म जाहला कृपाप्रसादची त्याचा हा ॥ अमरावति ती विशाल नगरी वऱ्हाड देशी प्रथित असे ॥ श्रीअंबा स्वामिनी तेथिची सिद्धस्थान बहु श्रेष्ठ असे ॥ श्रीजगदंबा तुलजा माता कुलस्वामिनी वरदानी ॥ श्रीगुरु टेंबे स्वामी दयाघन द्रवले मजवरि गुण खानी ॥ कृपे ययांच्या पूर्ण जाहला ग्रंथ गुरुचरित पद्यमय ॥ दुरित जगाचे जावो गाता देवो सकलां हा अभय ॥ गुरुचा आशिर्वाद असे या गाइल प्रेमे ग्रंथवरा ॥ सप्ताही वा एक पद्य जरि कृपा करिन त्या वारिवरा ॥ कृष्णाग्रज कवि प्रार्थि पुन्हा की नित्य पूजनी या ठेवा ॥ सर्व सुखाचा गुरुकृपेचा खा रवा सुरस असा मेवा ॥ १ ॥

अध्याय ५२ वा—पद्य १० वें

( चाल—अहो ही माया ) [ नित्यपाठाकरिता अवतरणिका ]

प्रथमाध्यायी । मंगल गुरु स्मरण ॥ भेटती शिष्या गुरुचरण ॥ द्वितीयाध्यी । कठिण गुरुसेवा । संदीपक कारि धारि भावा ॥ तृतीयाध्यायी । अंबरीष महिमा । चतुर्थी दत्तजन्मगरिमा ॥ पंचमाध्यायी ॥ जन्मति श्रीपाद ॥ षष्ठी तीर्थि फिरे वरद ॥ सप्तमी जाती । गोकर्ण क्षेत्री । भूपचांडाली सुपवित्री ॥ अष्टमी तारी । मूर्खा उपदेशी ॥ शनिप्रदोषाते अति हर्षी ॥ रजक नवमात ॥ आशीर्वच लाहे ॥ दशमी विप्रा जिववि स्वये ॥

पुढें अकरात्री ।। करंजपुरि जन्म ।। नृसिंह सरस्वति घे नाम ।। द्वादशाध्यायी ।। माते उपदेशी ।। काशिला येति ज्ञानराशी ।। घेति संन्यास ।। उद्धरती भक्तां ।। पोटशुलाची हरिली व्यथा ।। चतुर्दशि आले ।। सायं देव गृही ।। यवन नृप शरण विप्रपायी ।। पंचदशि तीर्थे ।। शिष्या करवीती ।। वैजनाथी गुप्तचि राहती ।। षोडशी विप्रा ज्ञान दान देती ।। सप्तदशि विद्या विप्रसुती ।। भिल्लवडिवासी ।। अष्टा दशमात ।। वाडिला गुरु-स्वामी येत ।। विप्रगृहि भिक्षा ।। भाजि घेवड्याची ।। खाउनि रास दे धनाची ।। योगिनी सेवा ।। आवडली तेथे ।। उद्धरी गंगानुज निगुते ।। विश एकविशी ।। शिराळ ग्रामीचा ।। जिवविला पुत्र विप्रस्त्रीचा ।। बाविशी आले ।। गाणग-पुरि सिद्ध ।। वांझ महिषीचे पी दुग्ध ।। तेविशी राव ।। माने नगरात ।। आणिता समंध उद्धरित ।। तिविक्रम यतिला ।। चाविशी गुरु भेट ।। गर्व घालवी दूर नेट ।। पंचविंशात वादि ।। विप्र आले ।। श्रीगुरुउपदेशिति वहिले ।। परी नायकती ।। षड्विंशी त्यासी ।। कथिति चहु वेदां गुणराशी ।। बोधिति ज्ञान परि ते उन्मत्त ।। सत्ताविशी येई पतित ।। गुरु तयालागी ।। करिता सज्ञान ।। करी वा वाद यां सुजाण ।। शापिले विप्रा ।। अट्ठाविशि पतिता ।। धर्मा धर्म वदोनि कथा पुढील अध्यायी ।। विभूतिचा महिमा ।। वामदेवाचा गुरु गरिमा ।। त्रिशि सतिगाथा ।। पतिला आरोग्य ।। होवो अखंड सौभाग्य ।। गाणगी आली ।। पतिप्राण गेले ।। गुरुने सति धर्मा कथिले ।। शरण

गुरुपायी ॥ सति अमृत लाभे ॥ पतीही जिवंत तो शोभे ॥ पुढिल अध्यायीं ॥ शिवपूजा महती ॥ तशी रुद्राक्ष पुण्य गणती ॥ महानंदेची ॥ तैसी सिमंतिनी ॥ रुचिर चरिताहि देवयानी ॥ पंचत्रिंशात ॥ पूर्णकथा करिती ॥ परत ते जाति माद भरिती छत्तिसाध्यायी ॥ आन्हिक आचरण ॥ परान्नी दोष दावि गहन ॥ सदतिसी तेच ॥ कर्ममार्ग सारा ॥ विप्रा कथिति सदाचारा ॥ अडतिशी नवल ॥ गुरुने तै केले ॥ चतुःसहस्रा भोजन दिधले ॥ साठ वय वंध्या ॥ पुत्रवती केली ॥ शुष्क काष्ठा पालवि आली ॥ पुढें अध्यायी ॥ सायं देवाते ॥ कठिण गुरुसेवा कथि निगुते ॥ अनंत व्रताते ॥ त्रेचाळिशि कथिती ॥ ततुंका पुढती उद्धरिती ॥ पंचेचाळिशि ॥ संदेहित विप्र ॥ उद्धरति स्नाने त्या क्षिप्र ॥ कवी नरहरी ॥ भेटति कीं त्याला ॥ आपुला दास करिति कविला ॥ सत्तेचाळिशी ॥ दीपवाळी स्नान ॥ अठ्ठेचाळिशी शूद्रकथन ॥ एकुण पन्नाशी ॥ अष्टतीर्थे कथिली ॥ पन्नाशी यवन कथा वहिली ॥ एकावन्नात ॥ निजानंद गमनी ॥ राहिले गुरु गाणगभुवनी ॥ पद्यमय ऐशी ॥ कथा पूर्ण झाली ॥ सद्‌गुरुकृपे भरति आली ॥ अन्नतरणिका ही ॥ गाता प्रेमाने ॥ चरित वाचनी पुण्य देणे ॥ गुरुकृपा लाभे ॥ कृष्णाग्रजगाला ॥ गुरुच्या कृपे धन्य झाला ॥ १ ॥

॥ सातवा दिवस समाप्त ॥

॥ एकंदर पद्य संख्या—६८ ॥

# जनता जनार्दनास विनंती—

पद्य ६९ वें (राग—भैरवी ताल—त्रिताल)

हा गुरवर हृदयी साठवा ॥ मुखि नाम प्रभूचे आठवा ॥ धृ ॥ शिणतसा उगा भवसागरी ॥ खचित हा गुरु तुम्हां उद्धरी ॥ फुकाचा मिळाला सुखाचाच ठेवा ॥ १ ॥ जगति या विसावा हा खरा ॥ पुरवितो मनोरथ हा बरा ॥ गा सुखे निजगृही तृष्ट व्हा ॥ २ ॥ कवि कृष्णाग्रज कारि प्रार्थना ॥ क्षणभरी स्मरा जगज्जीवना ॥ गोष्पदासम तराया भवा ॥ ३ ॥

पद्य ६९ वें—आर्या (कवि कुल गुरु परंपरा)

जागेश्वर नाम पिता माता पार्वति कुशीत हो जनन ॥ नामे नरहरि कवि हा अमरावति वासिनी करी जतन ॥ १ ॥ सेवे कारि दत्ताचा घेती पदरात वासुदेव मला ॥ श्रीगुरु टेंबे स्वामी तारक तो या भवी खरा गमला ॥२॥ कीर्तन प्रवचन कारि तो पोटासाठीं अखंड भारत हा ॥ राज्य करीत ययाचे भिक्षा मागोनी देवनामि पहा ॥ ३ ॥ गुरुच्या मानसि आले करविली सेवा गुरुचरित्रगान ॥ त्याचे तोच वदविता मजला याचा नकोहि अभिमान ॥४॥ डोंबिवली मुक्कामी सन पन्नासात ग्रंथ हा लिहिला ॥ तोषो सद्गुरु जनता जनार्दनहि लाभ लाभुनी महिला ॥५॥

(समाप्त)

अंनत कोटी ब्रम्हांडनायक राजाधिराज
श्रीसद्गुरु नृसिंह सरस्वती स्वामी महाराज कीं जय
सिद्धांत अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त

## पद्य १ ले

( राग **यमन**—ताल **त्रिताल** )

दत्त दिगंबर ध्यावा ॥ मानसि ॥ धृ ॥ षड भुज सुंदर शामल मूर्ती ॥ प्रसन्नवदना त्रिभुवन कीर्ति ॥ कानिकुंडले दिव्यशोभती ॥ ऐसा गुरु स्मरावा मानसि ॥१॥ केशर कस्तुरि चंदनमाळा ॥ हेम मुक्त मणि मय त्या माळा ॥ रुद्राक्षासह शोभती गळा ॥ विश्व विभूषण गावा ॥ मानसि॥२ ॥ पायी वाळे रुमझुम करिती ॥ वरदहस्तही गुरुवरमूर्ति ॥ कृष्णाग्रज प्रार्थी सुजना प्रति ॥ सर्व सुखाचा ठेवा ॥३॥

## पद्य २ रे

गुरुमूर्ति आठवा साजिरी ॥ प्रभुमूर्ति स्मरावी साजिरी ॥ धृ ॥ शुभ समचरणी उभी आसनी ॥ दत्तमूर्ति ही पहा सुनयनी ॥ नाना परिमल सुमना भरणी ॥ रम्य सुलक्षण हासरी ॥ १ ॥ ध्यान मनोहर गुरुदत्ताचे ॥ सद्भक्तांच्या हृदयीनाचे ॥ दत्त दत्त नितवदतावाचे ॥ मोद होय अभ्यंतरी ॥ २ ॥ हाच गाणग क्षेत्री वसतो ॥ कृष्णातीरी भक्तां दिसतो ॥ रेवताचली हाच शोभतो ॥ व्यापुनि उरला चराचरी ॥ ३ ॥ सुमने सु-मने पूजा करिती ॥ स्मरणें साठविती निजचित्ती ॥ कृष्णाग्रज मनिची विश्रांती ॥ तारिल हा भव सागरी ॥ ४ ॥

## पद्य ३ रें

( राग **भीमपलास**—ताल **झपताल** )

दत्तगुरु अभयकर स्मर सुखें मानवा ॥ सहज तरशील भवि लाभ होईल नवा ॥ धृ ॥ जन्म किती भूवरी, घेतले आजवरी ॥ नाहि स्मरलें तुझे चित्त कधिं केशवा ॥ १ ॥ मनुष्यजन्मीं आतां घेशि जरि सद्व्रत ॥ सहज तरशील तूं॥ तारिशिल जडजिवा ॥ २ ॥ दास कृष्णाग्रजा, पावली गुरुपुजा ॥ प्रार्थना ऽ तुजसि करि ॥ हृदयिं धरि माधवा ॥ ३ ॥

## देवीची पदें पद्य १ लें

पाव पावगे मला ॥ अंबिके, पाव पावगे मला ॥ धृ ॥

कुंकुम मळवट शोभे भाली ॥ रत्नप्रभा पसरे तव गाली ॥ रत्नजडित कंकणें करामधि ॥ आशिर्वच दे मला ॥ १ ॥ दिव्य पितांबर नेसुनि माते ॥ सुरम्य कंचुकि रत्नमयाते ॥ दशांगुली रमणीय मुद्रिका ॥ शोभति किती त्या तुला ॥ २ ॥ तुलजा माता तुजला म्हणती ॥ त्वरित पावशी ऐशी कीर्ति ॥ नवरात्री दर्शनास येती ॥ भक्त नमिति पाउला ॥ ३ ॥ मूळपीठ तुळजापुर सुंदर ॥ वास तुझा तेथेंच निरंतर ॥ भव्य तुझें मंदीर मनोहर ॥ प्रसिद्ध या भूतला ॥ ४ ॥ दास तुझा कृष्णाग्रज माते ॥ कुलस्वामिनी आमुची हें नातें ॥ पाजी झडकरि कृपाऽमृतातें ॥ पुरवी मम हेंतुला ॥ अंबिके ॥ ५ ॥

### पद्य २ रे

(**भावधरारे**—याच चालीवर)

चलागे जाउ ॥ तुलजापुर नयनी पाहू ॥ धृ ॥ सोज्वळ सुंदर रुपजियेचे ॥ पाहुनि साठवु मानसिसाचे ॥ वर्णू सद्गुण अपुल्या वाचे ॥ हृदयी ध्यावू ॥१॥ शामवर्ण शोभे मातेला ॥ कनकाऽभरणी भूषित तनुला ॥ पैंजण पायी सुरम्यबाला ॥ वदनी गावू ॥२॥ वरदा वरदायिनि जगदंबा ॥ भक्तप्रिया सुखदा शिवसांभा ॥ नयन मनोहर ती दिव्य प्रभा ॥ सत्सुखलाहू ॥३॥ हीच महालक्ष्मी करवीरी ॥ नाम रेणुका वसे माहुरी ॥ तीच मावुली तुलजा क्षेत्री ॥ अंतरिध्यावू ॥४॥ तुलजा तुलजा वदनी गाता ॥ प्रगट होय पुढती जगमाता ॥ देइल अभया आम्हा त्वरिता ॥ विजयी होउ ॥५॥ ही कृष्णाग्रज कुलस्वामिनी ॥ महाराष्ट्राची शुभवरदायिनि ॥ शिवराया पावली भवानी ॥ उभारूनि बाहू ॥ तुलजापुर नयनी पाहू ॥६॥

## गवळण पद्य १ ले

नंदाच्या आंगणी ॥ खेळतो गोकुल चिंतामणी ॥ धृ ॥ नवनित घेवुनि करी मुरारी ॥ प्रेमे ठेवी निज मित्रकरी ॥ स्वयेहि खाई मोदे श्रीहरि ॥ कंठी चमके मणी खेळतो ॥ १ ॥ पाण्या निघती गोपसुंदरी ॥ घेवुनिया कटिवरी घागरी ॥ रमती पाहुनि खेळ असा परि ॥ विसरुनि पाणी धुणी ॥ २ ॥ राधा आली पाहुनि हरिला ॥ हर्ष जाहला ओढी तिजला ॥ नवनित लावुनि तिच्चिया गाला ॥ नाचे नटवर झणी ॥ ३ ॥ लटक्या कोपे म्हणे राधिका ॥ कारे छळिसी गोप बालिका ॥ अंतरि परि हासली सुकलिका ॥ भक्तीच्या रंगणी ॥ ४ ॥ नयन मनोहर हरी नरहरी ॥ मेघः शामल रुप माधुरी ॥ मोहवि सकला लीला बहुपरि ॥ जाति सकल मोहुनी ॥ ५ ॥ रंगी रंगुनि सकल गोपिका ॥ नाचति गाती सुवर्ण लतिका ॥ सुरगण पाहति वरुनि कौतुका ॥ भाग्याची पर्वणी ॥ क्रीडतो ॥ खेळतो, नाचतो गोकुल चिंतामणी ॥ ६ ॥

## गवळण दुसरी

कां छळिसि गोपिका श्री हरी । विनवितो आम्हीं तुज परोपरी ॥ धृ ॥ सोड सोडरे मार्ग आमुचा ॥ गोरस हा बघ बाजाराचा ॥ भरलासे डेरियात साचा ॥ सासु वाट पाहील घरीं ॥ १ ॥ शामसुंदरा राजिव नयना ॥ येवू दे तुज लवकरि करुणा ॥ कृपा दृष्टिनें मदन मोहना ॥ पाहि आम्हांवरी दया करी ॥ २ ॥ कृष्ण म्हणे मग द्या कर माझा ॥ चालणार ह्या नाहित गमजा ॥ वृंदावनिचा ह्या मी राजा ॥ दहिदुध लोणी द्या करी ॥३॥ उतरा ओझे डोईवरचे ॥ तृप्त कर मन प्रथम आमुचे ॥ मित्र भुकेले असती साचे ॥ वाटा गोरस सत्वरी ॥४॥ निराश गोपी वादिति सर्वा ॥ घ्या घ्या खा हा दहि दुध मेवा ॥ तृप्त जनार्दन झाला

तेव्हां ॥ मार्ग देइ त्या सत्वरी ॥५॥ नवल वाटले मटकी भरली ॥ होती पुर्वीपरिस जाहली ॥ नमुनि नरहरीच्या पदकमली ॥ कुतुक करिति अभ्यंतरी ॥ हा नाटकि मोठा श्रीहरी ॥६॥

## श्रीविठ्ठलाची पदें पद्य १ लें

त्रैलोक्याचा धनी श्रीहरी पंढरीस आला ॥ पुंडलिकाच्या भक्तिबळानें विटेवरी ठेला ॥ धृ ॥ युगा युगापासूनि विठाई पावली कितिकाला ॥ शरण जाइ जो अनन्यभावें सहज तारि त्याला ॥ १ ॥ हांक मारितां शुद्ध मनानें पावे भजकाला ॥ साक्ष किती देतील संतहि तारक पतिताला ॥ २ ॥ कृष्णाग्रज सांगे विनवुनिया हृदयि स्मरायाला ॥ वाया भटकूं नका कुठेतरि जय विठ्ठल बोला ॥ ३ ॥

### पद्य २ रे अभंग

विठ्ठल गावा विठ्ठल ध्यावा ॥ जीविचा विसावा विठ्ठलचि ॥१॥ रूप मनोहर डोळाभरी पाहूं ॥ हृदयात साठवूं विठ्ठलचि ॥ धृ ॥ सावळा विठ्ठल मदनाची कांती ॥ जिवाची विश्रांती एक माझ्या ॥२॥ कृपाळू पणे तो तारील विठ्ठल ॥ धावण्या धावेल विठ्ठलचि ॥३॥ नाममात्र घेता घालवील चिंता ॥ कृष्णाग्रज दाता विठ्ठलची ॥४॥

९८०
REFBK-0014083
REFBK-0014083

३८७१५ ९।२।२५
१९२६ ५।३।२६

# सामुदायिक प्रार्थना

(सर्वांनी एकसुरांत म्हणणें)

**पद्य ७१ वें**

(राग—**भैरवी** ताल—**माळी**)

ही अनाथ जनता झाली ॥ भारता करी बलशाली रे ॥ धृ ॥
धनसुख नुरले कष्ट जिवा या ॥ धान्य पुरेना पोट भराया ॥
कोण तुझ्याविण त्राता सदया ॥ धाव प्रभो प्रतिपाळीरे ॥ १ ॥
आरोग्यहि गेलें सोडुनिया ॥ घरोघरी रोगाची छाया ॥ शक्ति
न शरिरी कष्ट कराया ॥ होइ अता तू वाली रे ॥२॥ विसरुनि तुजला
चुकलो सेवा ॥ म्हणुनि दाविशी ऐशा मेवा ॥ आलो शरण तुला
गुरुदेवा ॥ कोपु नको वनमाळीरे ॥३॥ धनधान्याची हो समृद्धी ॥
सन्मार्गिं वसो आमुची बुद्धी ॥ सर्व सुखाची होवो वृद्धी ॥ मागतसो
या कालीरे ॥४॥ दास तुझे आम्ही प्रभुराया ॥ प्रार्थितसो
जोडुनी करा या ॥ सस्य शामला भूमि कराया ॥ कृपामृतानें
ओली रे ॥५॥ कृष्णाग्रज हा करी प्रार्थना ॥ भारतभूच्या
राखी माना ॥ जगि पावो आम्ही सन्माना ॥ नमन तुझ्या
पदकमलीरे ॥ ६ ॥

(आरती सुरवातीलाच दिली आहे. दररोज प्रार्थना आरती करावी व आनंदात असावें. श्रीगुरु कृपा करतील हा भरंवसा ठेवावा. इति.)

# तुमचे डोळे जादूगार आहेत?

**पण केव्हां? आमच्या सिद्ध औषधी वापराल तर—**

श्रीक्षेत्र गाणगापूर येथें एका महात्म्यानें सांगितलेली व
स्वतः वापरलेली दिव्य औषधें यांत आहेत.
कित्येकांचे मोतीबिंदू गेले आहेत. शेंकडों लोक
वापरीत आहेत. आपणही वापरून पहा.

**मोतीबिंदूचा काळ. बाटली किं. रु. २॥, ५ व ७**

जाळे, फूल, टिक, मोतीबिंदू, पांढरेपणा वगैरेवर.
डोळे लाल होणें, खाजणें, खुपऱ्या, पाणी
गळणें, उष्णतेचे सर्व विकार बरे होतात.

रात्रपाळीच्या कामगारांना ही देणगीच आहे.

—वापरण्याची रीत सोबत कळविले जातें—

**पो. खर्च अलग.**

ज्योतिष कार्यालय व कोणत्याही रोगाकरितां
औषधी योजना करून पाठवू अथवा कळवू.

पत्ता—**नरहरशास्त्री कान्हे, उमरावतीकर.**
**मु. पो. पांडुरंगवाडी, डोंबिवली, जि. ठाणें (मुंबई)**